# सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समिती,

सोलापूर.

## आदर्श उपविधी

Scanned with OKEN Scanner

जा.क्र.पणन/कृउबास-सोलापूर/आदर्शउविदु/ ७९१ /२०१३
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,सोलापूर यांचे
कार्यालय,सोलापूर. दि. २० /२/२०१३

ज्ञापन :-

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ६१ व त्याखालील नियम १२१ अन्वये मा.पणन संचालक,महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील जा.क्र.सीएमआर/आर/अॅक्ट अॅन्ड रुल्स/दिनाक १८/९/१९८१ चे परिपत्रकान्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारानुसार मी,श्रीकांत मोरे,जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती,सोलापूर यांचे दिनांक ३१/१२/२०१२ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्रं. १० अन्वये खाली नमुद केलेप्रमाणे आदर्श उपविधी दुरुस्तीस मंजुरी देत आहे.

| अ.क्रं. | उपविधी क्रं. | दुरुस्तीनंतरची शब्दरचना | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | आदर्श उपविधी पान क्रं.१ ते ११४ | सोबत जोडल्याप्रमाणे | मंजूर |

सदरचे ज्ञापन आदर्श उपविधी धारीकेस लावुन ठेवणेत यावे.

जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था,सोलापूर.

प्रत,
१. सभापती/सचिव,कृषी उत्पन्न बाजार समिती,सोलापूर
२.जिल्हा विशेष लेखा परिक्षक,वर्ग-१,सहकारी संस्था,सोलापूर
**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**
मा.पणन संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे.

सोलापूर कृषि उत्पन्न
बाजार समिती,सोलापूर
आवकांक ९३००
विषय आदर्श उपविधी
दिनांक 25 FEB 2013

सचिव
सभापती

Scanned with OKEN Scanner

(अ) व्याख्या

१. बाजार समितीचे नांव

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील तरतुदीनुसार बाजार समितीचे नांव - सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समिती सोलापूर असे आहे व बाजार समिती कार्यालयाचा नोंदणीकृत पत्ता - श्री. सिध्देश्वर बाजार पेठ, हैद्राबाद रोड, सोलापूर – ४१३००५ असा आहे.

२. व्याख्या :

i) **संचालक :-**

संचालक या संज्ञेचा अर्थ पणन संचालक, महाराष्ट्र राज्य असा आहे. या उपनिदेश विषयात अगर संदर्भात कोणतीही बाधा येत नसेल तर,

ii) **अधिनियम :-**

अधिनियम या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ असा समजावा.

iii) **नियम :-**

नियम या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) नियम, १९६७ समजावा.

iV) **उपविधी :-**

उपविधी या संज्ञेचा अर्थ सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर चे उपविधी असा समजावा.

V) **बाजार क्षेत्र :-**

बाजार क्षेत्र म्हणजे बाजार समितीने प्राधिकृत केलेले असे क्षेत्र कि जेथे कृषि माल पणन संदर्भातील सर्व कृतीचे नियमन बाजार समितीद्वारे केले जाते. सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे बाजार क्षेत्र दिनांक २ नोव्हेंबर २००६ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-१ पुणे विभागीय पुरवणी मध्ये ७५०९ या पानावर मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था सोलापूर यांनी प्रसिध्द केलेली दिनांक १९ ऑक्टोंबर २००६ रोजीची अधिसूचना क्रमांक ई/एमकेटी/ एपीएमसी/सोलापूर ४४८८/२००६ मध्ये निर्दिष्ट केलेले क्षेत्र असा समजावा.

Vi) **मुख्य बाजार :-**

मुख्य बाजार या संज्ञेचा अर्थ अधिनियमाच्या कलम ५ मधील तरतुदीनुसार जाहिर केल्याप्रमाणे आहे. सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे मुख्य बाजार आवाराचे नांव श्री. सिध्देश्वर बाजार पेठ, हैद्राबाद रोड सोलापूर असे आहे. या मुख्य बाजार आवाराचे क्षेत्रफळ ४२ हेक्टर ३० आर इतके आहे.



Scanned with OKEN Scanner

दिनांक ११ जानेवारी २००७ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र पुणे विभाग, भाग-१ पुणे विभागीय पुरवणी मध्ये २८ ते ३० व्या पानावर मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था सोलापूर यांनी प्रसिध्द केलेली दिनांक ३० डिसेंबर २००६ रोजीची अधिसूचना क्रमांक ई/एमकेटी/ एपीएमसी / ५४२०/२००६ मध्ये निर्दिष्ट केलेले क्षेत्र असा समजावा.

Vii) **दुय्यम / उपबाजार :-**

..................................

Viii) **बाजार फी :-**

बाजार फी या संज्ञेचा अर्थ अधिनियमाच्या कलम ३१ मधील तरतुदीनुसार ठरविण्यात आलेली फी असा आहे.

iX) **देखरेख शुल्क (सुपरव्हिजन फी) :-**

देखरेख शुल्क (सुपरव्हिजन फी ) या संज्ञेचा अर्थ अधिनियमाच्या कलम ३४(अ) मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात आलेल्या देखरेखीचा खर्च असा आहे.

X) **अंशदान :-**

अंशदान या संज्ञेचा अर्थ अधिनियमाच्या कलम ३७(२) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास द्यावयाची रक्कम असा आहे.

Xi) **उपसमिती :-**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन ) अधिनियम १९६३ मधील कलम ३० अन्वये केलेले नियम यामध्ये ज्या शब्दाची व संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. त्याचा अर्थ अधिनियम व नियमात दिल्याप्रमाणेच असतील.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) १९६३ व त्या अन्वये केलेले नियम यामध्ये ज्या शब्दांची व संज्ञेची व्याख्या दिलेली आहे त्याचा अर्थ अधिनियम व नियमात दिल्याप्रमाणे असतील.



Scanned with OKEN Scanner

## (ब) अनुज्ञप्ती

३) नवीन अनुज्ञप्ती मागणी अर्ज :-

अ) अधिनियमातील नियम ६ व ७ मधील तरतुदीनुसार बाजार समितीकडून अनुज्ञप्ती घेवू इच्छिणाऱ्या व्यक्तिने आवश्यक ती अनुज्ञप्ती मिळण्यासाठी परिशिष्ठ १ ते ९ मध्ये विहीत केलेल्या नमुन्यात अर्ज केला पाहिजे. (हमीपत्र हे मुद्रांक कायद्यातील तरतुदीनुसार विहित केलेल्या मुद्रांक शुल्कावर देणे आवश्यक राहील.)

ब) बाजार समिती क्षेत्रामध्ये वेगवेगळया प्रकारच्या अनुज्ञप्ती घेवू इच्छिणाऱ्या व्यक्तिचे अर्ज अनुज्ञप्ती मंजूरी आणि अनुज्ञप्तीधारकावर नियंत्रण संगणकीकरणाद्वारे ठेवणे बाजार समित्यांना बंधनकारक राहील.

४) अनुज्ञप्तीधारकासाठी पात्रता :-

**अ) व्यापारी अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्जदाराची पात्रता**

१) व्यापारी अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्ज करणारी व्यक्ती सज्ञान असावी. ती नादार नसावी / वेडी नसावी. भारतीय कॉन्ट्रॅक्ट ॲक्टप्रमाणे करार करण्यास सक्षम असावी.

२) चांगल्या वर्तणुकीबाबत विशेष कार्यकारी दंडाधिकारी, शासनाचा राजपत्रित अधिकारी, नगरसेवक, ग्रामपंचायत सरपंच अथवा बाजार समितीच्या सदस्यांचा दाखला जोडला पाहिजे.

३) बँक गॅरंटी / पतदारी प्रमाणपत्र, रोख तारणाबाबतचा पुरावा व कागदपत्रे परिशिष्ट १० प्रमाणे, कृषि माल विक्रेत्याचे जर व्यापाऱ्याच्या चूकीमुळे काही नुकसान झाले आणि / किंवा जो कृषि माल व्यापाऱ्याने खरेदी केला आहे मात्र त्याची रक्कम अदा केली नाही अशा वेळी सदरील बँक गॅरंटी मधून नुकसान झालेल्या रक्कमे इतकी रक्कम कृषि उत्पन्न बाजार समितीने विक्रेत्यास द्यावी.

४) वजन मापाची खालील साधने असल्याबाबतचे घोषणा पत्र

i) एका वेळी किमान १०० किलोग्रॅम वजन करता येईल अशी प्रमाणित वजनाची साधने व साहित्य

ii) एक ग्रॅमपासून १०० किलोग्रॅमपर्यंत वजन करण्याची सर्व वजने

iii) द्रव पदार्थाच्या वजनाकरीता वापरावयाची प्रमाणित साधने व साहित्य

**ब) नवीन अडत्या / दलाल अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्जदाराची पात्रता**

१) नवीन अडत्या / दलालाची अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्ज करणारी व्यक्ती सज्ञान असावी. ती नादान नसावी / वेडी नसावी. भारतीय कॉन्ट्रॅक्ट ॲक्टप्रमाणे करार करण्यास सक्षम असावी.



Scanned with OKEN Scanner

२) चांगल्या वर्तणुकीबावत विशेष कार्यकारी दंडाधिकारी, शासनाचा राजपत्रित अधिकारी, नगरसेवक, ग्रामपंचायत सरपंच अथवा बाजार समितीच्या सदस्याचा दाखला जोडला पाहिजे.

३) बँक गॅरंटी / पतदारी प्रमाणपत्र, रोख तारणाबावतचा पुरावा व कागदपत्रे परिशिष्ट १० प्रमाणे कृषि माल विक्रेत्याचे जर आडत्या / दलालाच्या चुकीमुळे काही नुकसान झाले आणि / किंवा जो कृषि माल त्यांनी खरेदी केला आहे मात्र त्याची रक्कम विक्रेत्यास अदा केली नाही अशा वेळी सदरील बँक गॅरंटी मधून नुकसान झालेल्या रक्कमे इतकी रक्कम कृषि उत्पन्न बाजार समितीने विक्रेत्यास द्यावी.

४) कृषि उत्पन्न बाजार समितीच्या बाजार आवारात बाजार समितीची अधिकृत परवानगी असलेले दुकान / कायमस्वरुपी सुविधा (सदरील बाब दलालासाठीची अनुज्ञप्ती प्राप्त करण्यासाठी आवश्यक नाही)

**क) नवीन प्रक्रियादार अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्जदाराची पात्रता**

१) नवीन प्रक्रियादार अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्ज करणारी व्यक्ती सज्ञान असावी. ती नादान नसावी / वेडी नसावी. भारतीय कॉन्ट्रॅक्ट ॲक्टप्रमाणे करार करण्यास सक्षम असावी.

२) चांगल्या वर्तणुकीबावत विशेष कार्यकारी दंडाधिकारी, शासनाचा राजपत्रित अधिकारी, नगरसेवक, ग्रामपंचायत सरपंच अथवा बाजार समितीच्या सदस्याचा दाखला जोडला पाहिजे.

३) प्रक्रिया प्रकल्प असल्याबाबतचे घोषणापत्र

४) बँक गॅरंटी / पतदारी प्रमाणपत्र, रोख तारणाबावतचा पुरावा व कागदपत्रे परिशिष्ट १० प्रमाणे कृषि माल विक्रेत्याचे जर प्रक्रिया दाराच्या चुकीमुळे काही नुकसान झाले आणि / किंवा जो कृषि माल प्रक्रियादाराने खरेदी केला आहे मात्र त्याची रक्कम विक्रेत्यास अदा केली नाही अशा वेळी सदरील बँक गॅरंटी मधून नुकसान झालेल्या रक्कमे इतकी रक्कम कृषि उत्पन्न बाजार समितीने विक्रेत्यास द्यावी.

५) वजन मापाची खालील साधने असल्याबाबतचे घोषणा पत्र

i) एका वेळी किमान १०० किलोग्रॅम वजन करता येईल अशी प्रमाणित वजनाची साधने व साहित्य

ii) एक ग्रॅमपासून १०० किलोग्रॅपपर्यंत वजन करण्याची सर्व वजने

iii) द्रव पदार्थाच्या वजनाकरीता वापरावयाची प्रमाणित साधने व साहित्य

**ड) नवीन मापाडी / तोलणारा अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्जदाराची पात्रता**

१) नवीन मापाडी अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्ज करणारी व्यक्ती सज्ञान असावी. ती नादार नसावी / वेडी नसावी. भारतीय कॉन्ट्रॅक्ट ॲक्टप्रमाणे करार करण्यास सक्षम असावी.



Scanned with OKEN Scanner

२) चांगल्या वर्तणुकीबाबत विशेष कार्यकारी दंडाधिकारी, शासनाचा राजपत्रित अधिकारी, नगरसेवक, ग्रामपंचायत सरपंच अथवा बाजार समितीच्या सदस्याचा दाखला जोडला पाहिजे.

३) कोणतीही खाजगी अथवा अर्धवेळ / पूर्णवेळ नोकरी करणारी नसावी.

४) अर्जदार हा बाजार समितीच्या अनुज्ञप्तिधारी आडत्या अथवा खरेदीदार अथवा दलाल यांच्या कुटूंबातील नसावा.

५) शारिरीक क्षमतेबाबतचे प्रमाणपत्र

**ड) नवीन बखारवाला अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्जदाराची पात्रता**

१) नवीन मापाडी अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्ज करणारी व्यक्ती सज्ञान असावी. ती नादान नसावी / वेडी नसावी. भारतीय कॉन्ट्रॅक्ट ॲक्टप्रमाणे करार करण्यास सक्षम असावी.

२) चांगल्या वर्तणुकीबाबत विशेष कार्यकारी दंडाधिकारी, शासनाचा राजपत्रित अधिकारी, नगरसेवक, ग्रामपंचायत सरपंच अथवा बाजार समितीच्या सदस्याचा दाखला जोडला पाहिजे.

३) वेअर हाउस कायद्याखालील अनुज्ञप्ती व कोल्ड स्टोरेज असल्यास त्याबाबतचा परवाना

४) बँक गॅरंटी / पतदारी प्रमाणपत्र, रोख तारणाबाबतचा पुरावा व कागदपत्रे परिशिष्ट १० प्रमाणे कृषि मालाची गोदामामध्ये साठवणूक करणाऱ्याला जर बखारवाल्याच्या चुकीमुळे काही नुकसान झाले तर अशा वेळी सदरील बँक गॅरंटी मधून नुकसान झालेल्या रक्कमे इतकी रक्कम कृषि उत्पन्न बाजार समितीने विक्रेत्यास द्यावी.

**प) नवीन हमाल अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्जदाराची पात्रता**

१) नवीन हमाल अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्ज करणारी व्यक्ती सज्ञान असावी. ती नादार नसावी / वेडी नसावी. भारतीय कॉन्ट्रॅक्ट ॲक्टप्रमाणे करार करण्यास सक्षम असावी.

२) चांगल्या वर्तणुकीबाबत विशेष कार्यकारी दंडाधिकारी, शासनाचा राजपत्रित अधिकारी, नगरसेवक, ग्रामपंचायत सरपंच अथवा बाजार समितीच्या सदस्याचा दाखला जोडला पाहिजे.

३) शारिरीक क्षमतेबाबतचे प्रमाणपत्र

**फ) नवीन मदतनीस / सहाय्यक अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्जदाराची पात्रता**

१) नवीन मदतनीस अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्ज करणारी व्यक्ती सज्ञान असावी. ती नादार नसावी / वेडी नसावी. भारतीय कॉन्ट्रॅक्ट ॲक्टप्रमाणे करार करण्यास सक्षम असावी.



Scanned with OKEN Scanner

२) चांगल्या वर्तणुकीबाबत विशेष कार्यकारी दंडाधिकारी, शासनाचा राजपत्रित अधिकारी, नगरसेवक,ग्रामपंचायत सरपंच अथवा बाजार समितीच्या सदस्याचा दाखला जोडला पाहिजे.

३) सातवी किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण (खुलासा - व्यापारी, आडते, दलाल, प्रक्रियादार आणि वखारवाला यांना अनुज्ञप्ती प्राप्त करण्यासाठी आवश्यक अर्हतेमध्ये व्यक्ती संज्ञेत अनेक व्यक्ती, भागीदार संस्था, कंपनी, सहकारी संस्था, विश्वस्त संस्था, कायद्याखाली नोंदणीकृत संस्था या सर्वांचा अंतर्भाव होतो.)

५) **अनुज्ञप्ती नुतनीकरण अर्ज :**

अधिनियमाच्या कलम ७ मधील तरतुदीनुसार बाजार समितीकडून अनुज्ञप्ती नुतनीकरण करण्यासाठी माहे फेब्रुवारी अखेर परिशिष्ठ ११ ते १३ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात बाजार समितीकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

६) **अनुज्ञप्ती फी :**

बाजार समितीकडे अनुज्ञप्ती प्राप्त करण्यासाठी सादर केलेल्या अर्जासोबत अर्जदाराने महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) नियम, १९६७ चे नियम क्रमांक ६ व ७ यामध्ये नमूद केलेल्या दराने अनुज्ञप्तीची फीस अर्जासोबत बाजार समितीकडे भरली पाहिजे. अनुज्ञप्तीचा कालावधी बाजार वर्षाकरिता असेल व फीस पूर्ण वर्षाकरिता असेल.

i) **अनुज्ञप्ती फीस चे दर :**

| अ.क्र. | अनुज्ञप्तीचा प्रकार | अनुज्ञप्तीच्या फीसचे वार्षिक दर (रुपये) | अनुज्ञप्ती नुतनीकरणाच्या फीसचे दर (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | व्यापारी | २०० | २०० |
| २ | आडत्या | २०० | २०० |
| ३ | दलाल | २०० | २०० |
| ४ | प्रक्रिया करणारे | २०० | २०० |
| ५ | तोलणार व मापाडी | २० | २० |
| ६ | वखारवाला | ३० | ३० |
| ७ | हमाल (पुरुष हमाल,स्त्री हमाल) | १० | १० |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | अडत्या /व्यापारी/दलालाचे मदतनीस, सहाय्यक | २० | २० |
| ९ | इतर | १० | १० |

ii) **अनुज्ञप्ती फीस परतावा :-**

अनुज्ञप्ती मंजूर करणेपूर्वी अर्जदाराने अनुज्ञप्ती घेण्याची इच्छा नसलेबद्दल बाजार समितीस अनुज्ञप्ती अर्ज दाखल केल्यापासून ३० दिवसाचे आत लेखी कळविल्यास किंवा अनुज्ञप्तीचा अर्ज बाजार समितीने नाकारल्यास अनुज्ञप्ती फी ची रक्कम बाजार समिती परत करेल.

iii) जर बाजार समितीने काही कारणास्तव अनुज्ञप्ती प्राप्तीचा अर्ज नाकारला तर सदरील अर्ज नाकारण्याची स्पष्ट कारणे अर्जदारास योग्य त्या स्पष्टीकरणासह निर्णयाच्या १५ दिवसांच्या आत कळवावीत.

७) **जामिनकीची व करारनाम्याची पूर्तता करणे :**

नियम ६ अन्वये अनुज्ञप्ती मिळण्यासाठी सादर केलेल्या अर्जासोबत अर्जदाराने पुढे नमूद केलेल्या कमाल मर्यादेस अधिन राहून रक्कमेचे बँकेचे किंवा पतदार प्रमाणपत्र किंवा त्रयस्थ इसमाचे हमीपत्र दिले पाहिजे.

| अ.क्र. | अनुज्ञप्तीचा प्रकार | जामिनकीची रक्कम रुपये | |
|---|---|---|---|
| | | नवीन अनुज्ञप्ती रुपये | नुतनीकरण रुपये |
| १ | अडत्या / व्यापारी | १०००००/- | १०००००/- |
| २ | दलाल | १०००००/- | १०००००/- |

परिशिष्ठ क्र. १० प्रमाणे त्रयस्थ इसमाची हमी या स्वरुपात जामिन दिल्यास अर्जासोबत द्यावयाचे हमीपत्रास प्रचलित नियमानुसार योग्य त्या रक्कमेचे हमी मुद्रांकन असले पाहिजे.

त्रयस्थ इसमाची हमी एक व्यक्ती तीनपेक्षा जास्त अनुज्ञप्तीधारकास देण्यास पात्र राहणार नाही. नियम ६ किंवा ७ खाली अनुज्ञप्ती मंजूर केल्याचे बाजार समितीकडून अर्जदारास कळविण्यात आल्यानंतर उपविधीसोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक १४ ते १७ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे आवश्यक तो मुद्रांकीत करारनामा स्वखर्चाने करुन दिल्या खेरीज अनुज्ञप्ती मिळणार नाही. मात्र अनुज्ञप्तीचे नुतनीकरणाच्या बाबतीत असा मुद्रांकित



Scanned with OKEN Scanner

करारनामा परत करुन देण्याची आवश्यकता असणार नाही व अशा बाबतीत पूर्वी करुन दिलेला करारनामाच अस्तित्वात राहील.

८) **अनुज्ञप्ती देणे / अनुज्ञप्तीचे नुतनीकरण करणे :**

अर्जदाराने अनुज्ञप्तीसाठी विहित नमुन्यात अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत बाजार समितीने अर्जदारास विहीत नमुन्यात अनुज्ञप्ती दिली पाहिजे. तसेच अनुज्ञप्तीधारकाने नुतनीकरणासाठी अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत बाजार समितीने नुतनीकरण अर्जावर निर्णय घेतला पाहिजे.

९) **अनुज्ञप्तीची दुसरी प्रत देणे :**

अनुज्ञप्तीधारकास अनुज्ञप्तीची दुसरी प्रत हवी असल्यास त्याने बाजार समितीकडे प्रत हवी असल्याचे कारण नमुद करुन रितसर अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अनुज्ञप्तीधारकाने अर्जासोबत बाजार समितीस रु. १००/- चा भरणा केल्यानंतर बाजार समितीने अनुज्ञप्तीची दुसरी प्रत दुसरी प्रत असा उल्लेख करुन १५ दिवसात दिली पाहिजे

१०) **अनुज्ञप्ती नाकारणे :**

अर्जदाराने बाजार समितीकडून अनुज्ञप्ती प्राप्त करण्यासाठी विहीत नमुन्यात सादर केलेला अर्ज किंवा नुतनीकरणासाठी केलेला अर्ज बाजार समिती नियम ६(४) किंवा इतर कारणासाठी नाकारु शकेल. अस्विकृत केलेल्या अर्जाची स्पष्ट कारणे लेखी स्वरुपात निर्णयाच्या पंधरा दिवसाच्या आत अर्जदाराला कळविण्यात यावीत.

११) **अनुज्ञप्ती निलंबित करणे / रद करणे :**

अनुज्ञप्तीधारकाची अनुज्ञप्ती कायद्यातील कलम ८ मध्ये नमूद केलेल्या तसेच कायद्याखालील नियम व या पोटनियमातील तरतुदीचा भंग केल्याचे दिसुन आल्यास किंवा इतर कारणांसाठी निलंबित किंवा रद्द केली जावू शकेल. निलंबित किंवा रद्द केलेल्या अनुज्ञप्तीची स्पष्ट कारणे लेखी स्वरुपात निर्णयाच्या पधरा दिवसाच्या आत अर्जदाराला कळविण्यात यावीत.

१२) **अनुज्ञप्तीधारकांना ओळखपत्र / बिल्ला देणे :**

१) अनुज्ञप्तीधारकास बाजार समितीने ओळखपत्र / बिल्ला विनामूल्य दिला पाहिजे

२) बाजार समितीने दिलेले ओळखपत्र / बिल्ला हरविल्यास, गहाळ झाल्यास, दुसरे ओळखपत्र / बिल्ला बाजार समितीस रु. २५/- चा भरणा केल्यास व फोटोच्या दोन प्रती जमा केल्यास देण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

३) अनुज्ञप्ती नुतनीकरण नाकारल्यास, रद्द केल्यास नुतनीकरण न केल्यास ओळखपत्र / बिल्ला बाजार समितीस परत करणे बंधनकारक राहील. असे ओळखपत्र / बिल्ला परत न केल्यास अशी व्यक्ती शिक्षेस पात्र राहील.

४) ओळखपत्र / बिल्ला हस्तांतरणीय असणार नाही.

५) अनुज्ञप्तीधारकाने बाजार आवारामध्ये काम करत असताना संबंधित ओळखपत्र / बिल्ला जवळ बाळगणे बंधनकारक राहील व असे ओळखपत्र / बिल्ला हा बाजार समितीचे अधिकारी / कर्मचारी यांना दाखविणे बंधनकारक राहील.

६) अनुज्ञप्तीधारकाने यापूर्वी बाजार समितीकडे फोटो सादर केले नसल्यास अनुज्ञप्तीधारकानी बाजार समितीकडे दोन फोटो देणे बंधनकारक राहील.

१३) **अनुज्ञप्तीधारकाने ठेवावयाची कागदपत्रे :**

१) अनुज्ञप्तीधारकाने उपविधीमधील परिशिष्ठामध्ये विहीत केलेल्या नमुन्यात कागदपत्रे व नोंदवहया ठेवणे बंधनकारक राहील.

२) सभापती किंवा सचिव किंवा बाजार समितीने अधिकार दिलेल्या अधिकारी /कर्मचारी यांनी मागणी केली असता अनुज्ञप्तीधारकाने ठेवलेली कागदपत्रे / नोंदवहया तपासणीसाठी सादर केली पाहिजेत. तसेच त्यांच्या व्यवसायाच्या सर्व ठिकाणी प्रवेश करुन तपासणी करु दिली पाहिजे.

३) उपविधी १३(२) चे कारणाकरिता सभापती, सचिव किंवा बाजार समितीने या बाबतीत अधिकार दिलेल्या सेवकास -

अ) अनुज्ञप्तीधारकाच्या कोणत्याही व्यवसायाचे ठिकाणी प्रवेश करण्याचा

ब) कोणत्याही कागदपत्र वहया, नोंदवहया तपासण्याचा व त्यातील कोणत्याही मजकूराची नक्कल करुन घेण्याचा अगर मागण्याचा

क) बाजार किंवा बाजार क्षेत्रातून बाहेर जाणाऱ्या अथवा बाजार किंवा बाजार क्षेत्रात प्रवेश कणाऱ्या कोणत्याही वाहनास थांबविण्याचा, त्यातील माल, वस्तू पाहण्याचा अधिकार असेल.

१४) **अनुज्ञप्तीधारीची वर्तणूक :**

i) कोणत्याही अनुज्ञप्तीधारीने कोणत्याही अनधिकृत व्यक्तीशी बाजार क्षेत्रात जाहीर केलेल्या शेतमालासंबंधात व्यवहार करता कामा नये

ii) उपविधी १४(१) चे कारणांकरीता अधिकृत इसम म्हणजे बाजार समितीचे अनुज्ञप्तीधारी व माल विक्रेते हे समजण्यात यावेत.

iii) कोणत्याही आडत्याने किंवा कोणत्याही खरेदीदाराने कोणत्याही अनुज्ञप्तीधारी, तोलणार, मापणार, सर्वेक्षक यांना आपल्या नोकरीत घेता किंवा चालू ठेवता कामा नये किंवा ठरवून दिलेल्या बाजार आकाराचे दरापेक्षा जादा रक्कम पैशाचे किंवा अन्य रुपाने देता कामा नये.



Scanned with OKEN Scanner

iV) या उपविधीमध्ये आणि अथवा बाजार समिती व व्यापारी / आडते तसेच बाजारातील इतर घटक यांच्यामध्ये केलेल्या कुठल्याही करारात काहीही उल्लेख असला तरी गाळा, दुकान, जागा, गोदामधारकांच्या बाबतीत बाजार समितीच्या खालीलपैकी एक अथवा एकापेक्षा जास्त बाबी निदर्शनास आल्यास बाजार समितीने गाळाधारकांना दिलेला गाळा, दुकान, जागा आणि / अथवा गोदाम भाडेपट्टयाने (लिजवर) देण्यात आलेल्या कराराची मुदत संपण्यापूर्वी अगर संपल्यानंतर देखील ताब्यात घेण्याचा अधिकार बाजार समितीला असेल.

अ) गाळा/दुकान/जागा/गोदामधारक हे स्वतः बाजार समितीचे अनुज्ञप्तीधारक नसल्यास,

ब) गाळा/दुकान/जागा/गोदाम ज्या कारणासाठी देण्यात आले आहे, त्याच कारणासाठी त्याचा वापर ताबा दिल्यापासून ६ महिन्याचे आत किंवा बाजार समितीने वेळोवेळी वाढवून दिलेल्या मुदतीत विहीत कारणासाठी वापन न केल्यास अथवा त्याचा गैरवापर होत असल्यास

क) या संबंधी करण्यात आलेल्या करारातील कुठल्याही अटीचा भंग करुन ही गाळा/दुकान/जागा/ गोदाम ताब्यात असल्यास / ठेवल्यास

ड) बाजार समितीला बाधक / अपायकारक असे कारण गाळा/दुकान/जागा /गोदामधारकांकडून घडल्यास

ई) अनुज्ञप्ती धारकाने केलेली अशी कोणतीही कृती जी बाजार समितीच्या आणि / किंवा बाजारात सहभागी होणाऱ्या विक्रेते / शेतकरी यांच्या हिताला बाधक असेल

V) तोलणारांनी व मापणारांनी आवश्यक असेल त्याप्रमाणे व आवश्यक असेल तेव्हा बाजार समिती, तोल व मोजमाप करण्यासंबंधीची, जी पध्दत व रीत अंमलात आणील किंवा ठरविल त्या पध्दतीने व रितीने वागण्याचे नाकारता कामा नये.

अ) मापाडीची अनुज्ञप्ती मिळणेसाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तिचे वय कमीम कमी १८ वर्ष पूर्ण व जास्तीत जास्त ३० वर्षापेक्षा अधिक नसावे. मात्र अनुसूचित जाती जमातीचे अर्जदाराचे बाबतीत वय ३५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

ब) मापाडीची अनुज्ञप्ती मिळणेसाठी अर्ज करणारी व्यक्ती किमान इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेली असावी.

क) अर्जदाराने मापाडीची अनुज्ञप्ती मिळणेसाठी केलेल्या अर्जासोबत शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती व चांगल्या वर्तणूकीबाबत विशेष कार्यकारी दंडाधिकारी, शासनाचे राजपत्रीत अधिकारी, नगरसेवक अथवा ग्रामपंचायतीचे सरपंच यांचा दाखला जोडला पाहिजे.

ख) अर्जदारास मापाडीची अनुज्ञप्ती मंजूर करुन दिल्यानंतर एक वर्षाचे कालावधीत त्याचे कामकाज समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास त्याच्या अनुज्ञप्तीचे नुतनीकरण केले जाणार नाही.



Scanned with OKEN Scanner

ग) मापाडी अनुज्ञप्तीचे नुतनीकरण हे अनुज्ञप्तीधारकाचे वय ५८ वर्षे होवूपर्यंत वैध राहील.

घ) मापाडी अनुज्ञप्तीधारकास या बाजार समितीशिवाय इतर कोणत्याही बाजार समितीची मापाडी अथवा कोणतीही अनुज्ञप्ती धारण करता येणार नाही. तसेच त्यास कोणतीही खाजगी अर्धवेळ व पूर्णवेळ नोकरी करता येणार नाही तसे बाजार समितीस आढळून आल्यास त्यास बाजार समितीने दिलेली अनुज्ञप्ती रद्द करण्यात येईल.

ड) बाजार समितीची मापाडी म्हणून अनुज्ञप्ती धारण करणारी व्यक्ती याच बाजार समितीच्या अनुज्ञप्तीधारक आडते अथवा खरेदीदार व्यापारी यांच्या कुटूंबातील नसावी.

च) बाजार समितीची मापाडी अनुज्ञप्ती धारण करणाऱ्या व्यक्तीस या बाजार क्षेत्रात नियमन केलेल्या शेतीमालाच्या खरेदी विक्री तथा आडतीचा व्यवहार करता येणार नाही.

छ) अनुज्ञप्तीधारक मापाडीने बाजार समितीचे अधिकारी कर्मचारी सुचना देतील त्यानुसार व त्या ठिकाणी मापाईचे तोलाईचे काम केले पाहिजे व दररोज काम संपल्यावर तोलाई पत्रके कार्यालयात सादर केली पाहिजेत.

ज) अनुज्ञप्तीधारक मापाडीने कामावर असताना कोणताही मादक पदार्थ /पेय/सेवन करु नये.

झ) अनुज्ञप्तीधारक मापाडीने महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्याखालील सन १९६७ चे नियम व बाजार समितीचे उपविधी यातील तरतुदीचे पालन केले पाहिजे.

ञ) अनुज्ञप्तीधारक मापाडीस बाजार समितीला १५ दिवसांची आगाऊ नोटीस दिल्याशिवाय संपावर जाता येणार नाही.

ट) वरील उपनियमांचा भंग करणाऱ्या मापाडीची अनुज्ञप्ती रद्द अथवा निलंबित करण्याचा अधिकार बाजार समितीचे सचिव / सभापती यांना राहील.

ठ) नियमन कार्याचे सोईसाठी आवश्यक तेवढया मापाडीची संख्या ठरविणे व त्यांना अनुज्ञप्ती देणेबाबतचे संपूर्ण अधिकार बाजार समितीस राहतील.

ढ) बाजार समितीने विकसित केलेल्या बाजार आवारातील गाळयांच्या, सार्वजनिक जागेचा गैरवापर अथवा दुरुपयोग केल्यास जास्तीत जास्त रु. १००००/- पर्यंत दंड आकारण्याचा अथवा अनुज्ञप्ती रद्द करण्याचा अधिकार बाजार समितीस असेल.

Vi) अनुज्ञप्तीधारक, खरेदीदार आडत्या व्यापारी हुंडेकरी, प्रक्रिया करणारे दलाल, निर्यातदार, तोलणार, हमाल व इतर अनुज्ञप्तीधारकांना कायदा कलम ६(१) व नियम ५ मधील तरतुदीनुसार नियमित शेतीमालाची खरेदी विक्री संस्थेच्या घोषित, मुख्य व दुय्यम बाजारात करावयाचे आहे.



Scanned with OKEN Scanner

Vii) बाजार समितीच्या उपविधीमधील इतर पोटनियमांत काहीही अंतर्भूत असले तरी या पोटनियमांतील तरतुदीप्रमाणे एखाद्या अनुज्ञप्तीधारकाने अथवा इतर कोणत्याही अनधिकृत व्यक्तीने / फर्मने / कंपनीने नियमनाखालील वस्तूंचे मार्केटींग (खरेदी-विक्री) संस्थेच्या घोषित व दुय्यम मुख्य बाजार आवाराबाहेर करण्याच्या हेतूने अशा शेतीमालाची भरलेली वाहने घेऊन जाण्याचा प्रयत्न केल्यास अथवा घेऊन गेल्यास बाजार समितीने अधिकृत केलेले अधिकारी संबंधित शेतीमालाचे वाहन, शेतीमालासहित जप्त करतील.

जप्त केलेले वाहन शेतीमालासहीत मुख्य बाजार आवारात आणण्यात येईल व सदरच्या जप्तीसाठी आलेला खर्च संबंधित शेतीमालाचा मालधनी आडत्या/व्यापारी / सदरचे शेतीमालाचा कायदेशीर हक्कदार यांनी बाजार समितीकडे भरणा केल्यावर संबंधितास कायद्यातील तरतुदीनुसार सदरचा शेतीमाल बाजार आवारातच विक्रीस परवानगी देण्यात येईल. मात्र संबंधितानी ठराविक मुदतीत मालाची विक्री न केल्यास सदर शेतीमालाची विक्री बाजार समितीतर्फे कायद्यातील तरतुदीनुसार करण्यात येईल.

Viii) बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात जर कोणतेही व्यापारी, व्यक्ती/फर्म/कंपनी यांनी नियमनाखाली आणलेल्या शेतीमालाचा अनधिकृतरित्या घाऊक व्यापार करीत असल्याचे माहिती मिळाल्यास किंवा निदर्शनास आल्यास बाजार समितीचे अधिकृत अधिकारी, कायदा कलम ३२(अ) (३) व (४) मधील तरतुदीप्रमाणे सदर व्यापाऱ्यांच्या गोदामात, ऑफिस कार्यालयात किंवा धंद्याच्या ठिकाणी प्रवेश करतील व संबंधित कागदपत्र/शेतीमाल/वाहन/शेतीमालासहीत वाहन जप्त करतील आणि कागदपत्र/शेतमाल/वाहन जप्त केल्याची पावती देतील.

iX) उपविधी क्र. ५ व ६ खालील तरतुदींच्या अनुषंगाने केलेल्या पाहणीत / तपासणीत जर कायदा कलम ६(१) चा भंग होत आहे अथवा होणार आहे असे बाजार समितीच्या अधिकाऱ्यास आढळून आल्यास त्यावेळी अधिकृत अधिकारी कायदा कलम ४६ प्रमाणे संबंधित दिवाणी न्यायाधीश वर्ग १ कडे फौजदारी गुन्हा असा कायदा भंग करणाऱ्या व्यक्ती /फर्म /कंपनी विरुध्द दाखल करतील.

X) बाजार समितीने अधिकृत केलेल्या इसमास ५९ (ब) प्रमाणे संबंधित पोलीस अधिकारी, वाहने थांबविणे, कागदपत्र जप्त करणे, तसेच दंडात्मक कार्यवाही करणे या कामात मदत करतील.



Scanned with OKEN Scanner

Xi) जे कोणी वाहनधारक अधिकृत अधिकाऱ्यांचा हुकुम डावलून वाहन थांबविणार नाहीत अथवा कागदपत्रे पाहणीस देणार नाहीत अथवा अशी कागदपत्रे जप्त करु देणार नाहीत, अशा वाहनधारकांना कलम ६१ (२) प्रमाणे दर दिवशी रुपये १००/- दंड आकारण्यात येईल. जो पर्यंत अधिकृत अधिकाऱ्यांना कागदपत्र मिळणार नाहीत तोपर्यंत संबंधित वाहन ज्या ठिकाणी थांबविले असेल तेथेच राहील. त्यासाठी ५९ (ब) मधील तरतुदीनुसार पोलीस अधिकारी मदत करतील.

१५) **बाजार क्षेत्रात व्यवहार करण्यास मनाई :**

कोणत्याही इसमास वैध अनुज्ञप्तीशिवाय बाजार क्षेत्रात शेतमालाच्या खरेदी विक्रीविषयी प्रवेश व व्यवहार करता येणार नाही. मात्र थेट बाजार अनुज्ञप्तीधारक, करार शेती अनुज्ञप्ती धारक यांना सदरील व्यवहारात सूट देण्यात आली आहे.



Scanned with OKEN Scanner

## (क) फी

**१६) शेतीच्या उत्पन्नावरील फीचे दर :**

१) बाजार क्षेत्रात खरेदी केलेल्या शेतीमालावर बाजार समितीला बाजार फी व देखरेख खर्च आकारण्याचा व वसूल करण्याचा अधिकार राहील. सदर फी व देखरेख खर्च खरेदीदारास लागेल. आडत्यामार्फत व्यवहार झाल्यास सदर फी व देखरेख खर्च वसूल करुन समितीकडे भरण्याची जबाबदारी आडत्याची राहील. असा व्यवहार आडत्या व्यतिरिक्त ज्यांच्यामार्फत होईल त्यांचेवर बाजार फी व देखरेख खर्च खरेदीदाराकडून वसूल करुन बाजार समितीकडे भरणा करण्याची जबाबदारी राहील.

२) बाजार समितीने वसूल केलेला देखरेख खर्च हा शासनाकडे पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत भरणा करावा व तसा अहवाल संबंधित निबंधकाकडे सादर करावा.

३) बाजार फी व देखरेख खर्च दर -

| अ.क्र. | शेतीमालाचे नांव | परिमाण | बाजार फी दर रुपये | देखरेख खर्च दर पैसे |
|---|---|---|---|---|
| अ) | सर्व नियमित शेतीमाल (बेदाणा सोडून) | खरेदी किंमतीवर दर १००/- रुपयास | १.०० | ०.०५ |
| ब) | बेदाणा | खरेदी किंमतीवर दर १००/- रुपयास | ००.५० | ०.०५ |

४) बाजार आवारामध्ये अनियंत्रित मालाची खरेदी विक्री होत असल्यास अशा विक्री व्यवहारावर १००/- रुपयास रु.१/- सेवाशुल्क वसूल करण्याचा अधिकार बाजार समितीस राहील.

५) बाजार समितीने शेतमालाच्या थेट खरेदी विक्रीसाठी सुविधा उपलब्ध करुन दिली असल्यास त्याबाबतचे सेवाशुल्क ठरविण्याचे व वसूल करण्याचे अधिकार बाजार समितीस राहतील.

**१७) फी वसूली :**

१) बाजार क्षेत्रामध्ये शेतमाल खरेदी करणारे व्यापारी, आडते, खरेदीदार, प्रक्रिया करणारे (निर्यातदार) यांनी समितीकडे बाजार फी शेतमालाचे वजन किंवा मोजणी झाल्याबरोबर तावडतोब भरणे बंधनकारक राहील. अशी बाजार फी भरण्यास



Scanned with OKEN Scanner

कसूर केल्यास द.सा.द.शे. १२ टक्के या दराने दंडासहीत बाजार फी वसूल करण्याचे अधिकार बाजार समितीस राहतील.

२) **जनावरांकरीता गेट पास फी - खालीलप्रमाणे**

मोठी जनावरे - (गाय, बैल, म्हैस,रेडा,घोडा व इतर) रुपये ५/-

लहान जनावरे - (शेळी,मेंढी, बोकड व इतर )रुपये ३/-

३) **जनावर व कडबा बाजारातील स्टॉल होल्डर्स, हातगाडीवाले व इतर विक्रेते यांचे आकार**

जनावर व कडबा बाजारात स्टॉल होल्डर्स, हातगाडीवाले व इतर मालाचे विक्रेते हे बाजार समितीचे लायसेन्सी राहतील व त्यांना रोजचे लायसेन्स घ्यावे लागेल. रोजची लायसेन्स फी खालीलप्रमाणे राहील. त्यांना खुल्या जागेचे भाडेकरु असा हक्क राहणार नाही.

| प्रकार | आकार | मुदत |
|---|---|---|
| १) स्टॉल होल्डर्स | रुपये १०/- | प्रत्येक दिवशी |
| २) हातगाडीवाले | रुपये ५/- | प्रत्येक दिवशी |
| ३) इतर मालाचे विक्रेते | रुपये १०/- | प्रत्येक दिवशी |

वरील प्रमाणे लायसेंन्स फी भरुन प्रवेश करणा-या व्यवसायिकांना खालील नियमांचे पालन करावे लागेल.

१) एकाच लायसेंन्स फी वर फक्त एकाच ठिकाणी व्यवहार करता येईल एकापेक्षा जास्त ठिकाणी व्यवहार करण्याचे झाल्यास त्याची वेगळी लायसेंन्स फी भरावी लागेल.

२) पावती शिवाय लायसेंन्स फी भरल्याची तक्रार चालणार नाही मागणी केल्यास बाजार समितीचया नोकरास पावती दाखवावी लागेल.

३) व्यवसायिकांनी सचिव अगर बाजार समितीच्या अधिका-यांच्या सुचनांचे पालन केले पाहिजे. सूचनांचे उल्लंधन करणा-या व्यवसायिकांना सचिवांचे आदेशानुसार बाजारातून हाकलून देण्यात येईल त्यांची लायसेंन्स फी परत दिले जाणार नाही.

४) व्यवसायिकांनी आरोग्याच्या नियमांचे पालन केले पाहिजे व्यवसाय चालू करण्यास लागणा-या निरनिराळे अधिकारी वर्गाचे व संस्थेचे आवश्यक असे परवाने घेण्याची सर्व जबावदारी व्यवसायिकांवर राहील. बिगर परवाना व्यवसाय केल्यास ती व्यक्ती जबावदार राहील.

५) ज्या त्या व्यवसायिकांना फक्त ठरवून दिलेल्या जागीच स्टॉल घालता येईल किंवा गाडी घेवून उभे राहता येईल.



Scanned with OKEN Scanner

६) नुसती लायसेन्सी असल्यामुळे काही कारण न देता नुसते लायसेन्स बंद करुन तुम्हास प्रवेश बंद करण्याचा हक्क बाजार समितीस राहील.

७) अयोग्य व अशक्य वर्तणूक करणाऱ्या व्यावसायिकांना कोणतेही कारण न देता प्रवेश नाकारण्याचा अधिकार सचिव यांना देण्यात आला आहे.

८) प्रत्येक कडब्याच्या गाडीस व कडब्याच्या मोटारीस मुख्य बाजारात प्रवेश करण्यासाठी खालीलप्रमाणे प्रवेश फी विक्रीदाराकडून वसूल केली जाईल.

| शेतीमाल | परिमाण | आकारणी |
|---|---|---|
| कडबा | प्रत्येक बैलगाडीस | रुपये १०/- |
| कडबा | प्रत्येक मोटारीस | रुपये २०/- |

**१८) खरेदीदारास द्यावयाचे बिल :**

या उपविधीसोबत परिशिष्ट क्रमांक १८ मध्ये निर्दिष्ट केलेल्या नमुन्याप्रमाणे प्रत्येक आडत्याने खरेदीदारास विक्री केलेल्या मालासंबंधीचे बिल शेतीमालाचे वजन, मोजमाप झाल्यावरोबर तावडतोब दिले पाहिजे व त्याची एक प्रत बाजार समितीस दिली पाहिजे. सदरील पावती /बीलामध्ये खरेदी संख्या, किंमत, रक्कम, आडत्याची फी आणि इतर कायदेशीर वजावटीचा स्पष्टपणे उल्लेख असावा.

**१९) माल विक्रेत्यास द्यावयाची हिशोबपट्टी :**

प्रत्येक आडत्याने आणि आडत्याची नेमणूक केली नसल्यास खरेदीदाराने, विक्री झालेल्या मालासंबंधीची हिशोबपट्टी या उपविधीसोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक १९ अन्वये ठरवून दिलेल्या नमुन्यावर हुकूम, विक्री झालेल्या मालाचे वजन अगर मोजमाप झालेबरोबर तावडतोब तयार करुन विक्रेत्यास हिशोबपट्टी व संपूर्ण हिशोब दिला पाहिजे किंवा विक्रेता हजर नसल्यास त्यास पाठविला पाहिज. सदरील पावती / बीलामध्ये खरेदी संख्या, किंमत, रक्कम आडत्याची फी आणि इतर कायदेशीर वजावटीचा स्पष्टपणे उल्लेख असावा.

**२०) जनावरांची विक्री पावती :**

विक्री झालेल्या जनावरांची विक्री पावती या उपविधीसोबत परिशिष्ट क्रमांक २० मध्ये निर्दिष्ट केलेल्या नमुन्याप्रमाणे असेल. अशी पावती जनावरांची खरेदी केल्याबरोबर खरेदीदाराने, बाजार समितीचे अधिकृत इसमाकडून करुन घेतली पाहिजे व अशी पावती करणेबाबत बाजार समिती ठरवील त्या दराने खरेदीदाराने साक्षांकन फी ची रक्कम दिली पाहिजे.



Scanned with OKEN Scanner

## (ड) बाजार भाव प्रसिध्दीकरण, विक्री वजनमाप, हिशोब व साठा

२१) **बाजार भाव प्रसिध्द करणे :**
बाजार समितीने मुख्य व उपबाजार आवारात प्रमुख ठिकाणी आधीच्या दिवसाचा किंवा शक्य असेल तर चालू दिवसाचा कृषि मालाचे दैनंदिन बाजार विविधभाव फलकावर ठळकपणे प्रसारित करणे आवश्यक राहील.

२२) **बाजार आवारात शेतमाल घेवून येणाऱ्या वाहनांची नोंद करणे :**
बाजार आवारात कृषिमाल घेवून प्रवेश करणाऱ्या सर्व वाहनांची संगणकाद्वारे नोंद करणे आवश्यक राहील. त्यात बैलगाडयांचीही नोंद केली पाहिजे.

२३) **मालाची पोहोच देणे :**
आडत्या किंवा खरेदीदार यांनी दुकानात माल विक्रीसाठी आल्याबरोबर आवक नोंदवहीत नोंद करुन माल आणणाऱ्या इसमास त्या मालाची पोहोच पावती, या कामी बाजार समितीने सोबत जोडलेल्या परिशिष्ठ क्रमांक २१ मध्ये निर्दिष्ट केलेल्या नमुन्याप्रमाणे तावडतोब दिली पाहिजे.

२४) **विक्रीची पध्दत :**

१) संचालक निर्देशित करतील त्या बाजार समिती शेतमाल विक्रीची व्यवस्था इलेक्ट्रॉनिक लिलाव पध्दतीने करावी लागेल व शेतमालाची किंमत मध्यवर्ती पध्दतीने अदा करावी लागेल. आवश्यकतेप्रमाणे बाजार समिती संगणकीय लिलाव पध्दती वापरु शकेल.

२) शेतमालाची विक्री हत्ता पध्दतीने केल्यास बाजार समितीने संबंधित अनुज्ञप्तीधारकावर त्वरीत कारवाई करणे बंधनकारक राहील.

३) अपवादात्मक परिस्थितीत शेतीमालाची खरेदी विक्री नमुना पध्दत व उघड (खुल्या) कराराने, निविदा मागवून करता येईल.

४) जर संचालक यांनी निर्देश दिले तर निर्देशित केल्याप्रमाणे बाजार समिती कृषि उत्पन्न विक्री ही यांत्रित लिलाव पध्दतीने करेल आणि प्राण्यांची विक्री ही शरीराचे वजन आणि दुधाचे उत्पन्न याप्रमाणे करेल आणि / किंवा विक्रेत्याला केंद्रीय पध्दतीने रक्कम अदा करेल.

५) असे लिलाव सुरु होण्याअगोदर प्रत्येक आडत्याने सोबत जोडलेल्या परिशिष्ठ क्रमांक २२ मध्ये विहीत नमुन्यातील सौदा पट्टीच्या तीन प्रतीत माहिती लिहून तयार ठेवावी.



Scanned with OKEN Scanner

६) बाजार समितीने अधिकृत केलेल्या व्यक्तीस प्रत्येक आडत्याने जाहीर लिलावाचे वेळी सौदा पट्टीच्या प्रती दिल्या पाहिजेत.

७) ज्या खरेदीदाराने जास्तीत जास्त भावाची बोली केली असेल तो भाव त्या खरेदीदाराचे नाव बाजार समितीचा सेवक सौदा पट्टीत नमूद करेल व त्याच वेळी खरेदीदारची सही घेईल.

८) प्रत्येक आडत्याने दुकानातील जाहीर लिलाव संपल्यानंतर त्या प्रत्येक सौदा पट्टीवर संबंधित आडत्या किंवा त्याचा अधिकृत मदतनीस आणि बाजार समितीचा सेवक सहया करतील व त्याची प्रत बाजार समिती व अनुज्ञप्तीधारक मापाडयास वजन भार करण्यासाठी देतील.

९) विक्री झाल्यानंतर अनुज्ञप्तीधारी तोलणारा अगर मापाडी यांचेमार्फत मालाचे वजनमाप अगर सौदापट्टी करुन वजनमाप या पध्दतीपैकी जी पध्दत बाजार समिती ठरवील त्या पध्दतीने करण्यात येईल व बाजार समितीने ठरवून दिलेल्या नमुन्यातच (सोबत जोडलेले परिशिष्ट क्र.२३) त्यांचेकडून काटापट्टी तयार करुन संबंधिताना देण्यात येईल.

१०) काटापट्टी/ सौदा नोंदीच्या अनुरोधाने बिल व हिशोबपट्टी करण्यात येईल व त्याच्या प्रती अनुक्रमे संबंधित खरेदीदार बाजार समिती व मालधनी यांना देण्यात येतील.

११) शेतीमालाची विक्री झाल्यावर मालधन्यास चोवीस तासात मालाची किंमत अदा केले जाईल व याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी बाजार समितीची राहील.

१२) विक्रीसाठी आलेला माल आडत्यास स्वत:करता खरेदी करता येणार नाही. मात्र एखाद्या वेळी शेतीमालास खरेदी दर नसेल किंवा योग्य किंमत येत नसेल व विक्रेत्यास लगेच माल विकायचा असेल त्यावेळी आडत्या सचिवाचे पूर्वपरवानगीने असा माल खरेदी करु शकेल.

१३) आडते /व्यापारी यांना हिशोबपट्टया व बिल प्रमाणित केल्याखेरीज वापरता येणार नाही.

**२५) थेट विक्री :**

१) किरकोळ विक्री : किरकोळ विक्री म्हणजे शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या मालाची ग्राहकास थेट किंवा कोणत्याही इसमाने ग्राहकास त्याच्या व त्याच्या कुटूंबियाच्या उपभोगासाठी शेतमालाची पुढे नमूद केलेल्या कमाल मर्यादेस अधिन राहून केलेली विक्री असा असेल.



Scanned with OKEN Scanner

अ) खालील मालाची १० किलापर्यंतची विक्री ही किरकोळ विक्री समजण्यात येईल.

| क्रम | शेतमालाचे नांव |
|---|---|
| १ | फळे, भाजीपाला व नाशवंत शेतीमाल |
| २ | चिंच |
| ३ | आले |
| ४ | लसूण |
| ५ | ओला कांदा (कांदा पात) |
| ६ | बेदाणा |
| ७ | हळद |
| ८ | ओल्या भुईमूग शेंगा |
| ९ | मक्याचे कणिस |
| १० | ओली व सुकी मिरची |
| ११ | ओला वटाणा |
| १२ | विडयाची पाने (१ करंडी) |
| १३ | धने |
| १४ | मिरची |
| १५ | तीळ |
| १६ | मोहरी |
| १७ | मेथी |

ब) खालील मालाची ५० किलापर्यंतची विक्री ही किरकोळ विक्री समजण्यात येईल.

| क्रम | शेतमालाचे नांव |
|---|---|
| १ | गहू |
| २ | ज्वारी |
| ३ | बाजरी |
| ४ | मका |
| ५ | तांदूळ |
| ६ | सुके कांदे, बटाटे |
| ७ | वरई |
| ८ | तूर |
| ९ | मूग |
| १० | उडिद |



Scanned with OKEN Scanner

| क्रम | शेतमालाचे नांव |
|---|---|
| ११ | हरभरा |
| १२ | वटाणा |
| १३ | गूळ |
| १४ | करडई |
| १५ | जवस |
| १६ | अंबाडी |
| १७ | तेलबिया |
| १८ | एरंडी |
| १९ | सरकी |
| २० | शेंग |
| २१ | शेंगदाणा |
| २२ | सुर्यफूल बी |
| २३ | चवळी |
| २४ | सावा |
| २५ | चिंचुका |
| २६ | सोयाबीन |

क) फुले - गुलाब,कार्नेशन, जर्बेरा व विदेशी /दुर्मिळ फुले यांचे १०० देठ व इतर फुलांसाठी १० किलो

२) मोठया ग्राहकांना त्यांच्या उपभोगासाठी शेतकरी त्यांचा शेतीमाल थेट विक्री करु शकतील आणि त्यासाठी बाजार समिती आवश्यक त्या सुविधा निर्माण करेल.

२६) **बाजार भावाची परिमाणे-**

जाहीर केलेल्या शेतीमालाच्या खरेदी-विक्रीचे दर ठरविणेची व वजनमाप सांगण्याची परिमाणे खालील प्रमाणे राहतील.

**अ) क्विंटल या परिमाणात येणारा शेतीमाल :-**

| क्रम | शेतमालाचे नांव |
|---|---|
| १ | गुळ,हळद,मिरची,धने |
| २ | द्राक्ष,मोसंबी,संत्री,आंबे,केळी,कलिंगड |
| ३ | भुसार,तेलबिया,कडधान्य |
| ४ | कापूस,सरकी |
| ५ | चिंच,वाटाणा |



Scanned with OKEN Scanner

ब)    १० किलोच्या परिमाणात येणारा शेतीमाल :-

| क्रम | शेतमालाचे नांव |
|---|---|
| १ | फळे,फळभाज्या,टोमॅटो,भोपळा |
| २ | बेदाणा |
| ३ | झेंडू,मोगरा,पाकळी गुलाब इ.फुले |

क)    नग या परिमाणात येणारा शेतीमाल :-

| क्रम | शेतमालाचे नांव |
|---|---|
| १ | पालेभाज्या |
| २ | गुरे,शेळया,मेंढी,बकरी. |
| ३ | कट फ्लॉवर्स,जर्बेरा,कार्नेशन,गुलाब |
| ४ | कडबा |

**२७) वजन मापाची साधने :**

१) प्रत्येक आडत्या, व्यापारी, वखारवाला व प्रक्रिया करणारे यांनी बाजार किंवा बाजार क्षेत्रात वापरण्याकरीता वजनमापाची खालील साधने ठेवली पाहिजेत.

अ)एकावेळी किमान एक क्विंटल वजन करता येईल असे वजनाचे साधन व साहित्य

ब)एक ग्रॅमपासून १०० किलोपर्यंतचे वजन करण्याची सर्व वजने

क)द्रव पदार्थांकरीता वापरावयाची साधने व साहित्य

ड)वजन मापातील विलंब टाळून वजनात अचूकता येणेसाठी इलेक्ट्रॉनिक वजनकाटयाचा वापर करणे आवश्यक राहील.

२) मुंबई वजन व मापे (अंमलबजावणी अधिनियम १९०८) मधील तरतुदीनुसार प्रमाणभूत केलेली वजने, मापे व उपकरणे ही बाजार क्षेत्रात शेतीमालाचा व्यवहार करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकांनी वापरणे बंधनकारक राहील.

३) बाजार समितीने वे ब्रीजची व्यवस्था केल्यास अशा वे ब्रीजवर वजन करण्याचा, दर ठरविण्याचा अधिकार बाजार समितीला राहील.

४) बाजार समितीने वजन, मापे, काटे, वे ब्रीजवर आवश्यक ती उपकरणांची व्यवस्था करुन दिल्यास त्याचे दर ठरविण्याचे अधिकार बाजार समितीस राहतील.

**२८) बाजार आकार :**

१) आडते, व्यापारी, दलाल, तोलणार, मापाडी तसेच गोदाम धारक व इतर अनुज्ञप्ती धारक यांच्या कामगिरीबद्दल व शेतमाल खरेदी विक्री संबंधात, बाजार क्षेत्रांमध्ये केलेल्या इतर



Scanned with OKEN Scanner

कामांबद्दल त्यांनी आकारावयाचा बाजार आवारातील बाजार आकार हे खाली नमूद केल्याप्रमाणे असतील.

अ) ज्या शेतीमालाचे परिमाण हे वजनावर आहे असा शेतीमाल वजनासाठी लावण्यापर्यंतचे दर हे मालधनी / विक्रेता यांनी द्यावयाचे आहेत व त्यानंतरचे दर खरेदीदाराने द्यावयाचे आहेत.

ब) ज्या शेतीमालाचे परिमाण नगावर आहे अशा शेतीमालाच्या मोजणीपर्यंतचे दर हे मालधनी / विक्रेता यांनी द्यावेत व त्यानंतरचे दर खरेदीदाराने द्यावेत.

क) बाजार आवारामध्ये शेतीमालाच्या खरेदी विक्रीसाठी शेतीमाल उतरविणे, चढविणे, भरणे, खाली करणे, ढिग लावणे, विल्हेवाट लावणे, साफ करणे व इतर कामे करण्यासाठी हमालांना हमाली देणे आवश्यक आहे. तसेच मापाडी, तोलणार यांनाही त्यांच्या कामाचा मोबदला देणे आवश्यक आहे. तोलणाऱ्याने त्याला नमूद केलेल्या काट्यावर समक्ष वजन करुन बाजार समितीस अहवाल दिला पाहिजे. जर आडत्या / खरेदीदार यांचे स्वतःच्या मालकीचे वजन मापाचे यंत्र असेल तर आडत्या / खरेदीदार स्वतः वस्तूची तोलाई करु शकतील.

ड) बाजार आकारामध्ये आडते, दलाली, मापाडी, हमाली, साफ करणे, चाळणा करणे, बॅगची शिलाई करणे, ढिग करणे, स्टॅंपींग करणे, मालाची गोदामाकडे वाहतूक करणे, प्रतवारी करणे, सर्व्हेक्षण करणे इत्यादी आकारांचा समावेश होतो.

**इ) शेतकरी, विक्रेता, मालधनी यांनी द्यावयाचे बाजार आकार :**

| उपविधी क्र. | वसूलीचा प्रकार | शेतीमाल | परिमाण | दर | कोणाकडून वसूलीस पात्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २८(१) (इ)(१) | कमिशन | अ) कापूस,रुई,जोड,गहू,तांदूळ, भात, ज्वारी,बाजरी,वरई, मका, सावा, तूर, हरभरा,उडीद,मूग, चवळी, मटकी, वाटाणा,शेंग, शेंगदाणा, जवस, तीळ, करडी, अंबाडी,एरंडी,कारळे, सूर्यफूल बी,गूळ,हळद, धने, मिरची, मोहरी,मेथी, कडवा, चिंचोका, सोयाबीन | १००/- रुपये विक्रीवर | रु. ३/- | विक्रीदाराकडून |
| | | ब) कांदा | १००/- रुपये विक्रीवर | रु. ३.५० | विक्रीदाराकडून |



Scanned with OKEN Scanner

| उपविधी क्रं. | वसूलीचा प्रकार | शेतीमाल | परिमाण | दर | कोणाकडून वसूलीस पात्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २८(१) (इ)(१) | कमिशन | क) विड्याची पाने, केळी, लसूण, चिंच,वटाटे, रताळी | १००/- रुपये विक्रीवर | रु. ५/- | विक्रीदाराकडून |
| | | ड) आंबा,लिंबू,द्राक्षे,खरबूज, कलिंगडे, पेरु,सिताफळे, टोमॅटो,पालेभाज्या, ताजेभाज्या, मोसंबी,संत्री, डाळींब, चिक्कू,पपई, सफरचंद, बोरे,आले, सर्व प्रकारची फुले, अननस | १००/- रुपये विक्रीवर | रु. ६/- | विक्रीदाराकडून |



Scanned with OKEN Scanner

## हमाली व तोलाईचे सुधारीत दर

| उपविधी क्रमांक | वसुलीचा प्रकार | शेतीमाल | परिमाण | दर | क्रिया | कोणाकडून वसूलीस पात्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २८(१) (इ) (२) ए) | हमाली | करडी, शेंगदाणा साळ, जोड, कारळ, एरंडी, सुर्यफूलबी, सोयाबीन | ५० किलोपर्यतच्या पिशवीस / पोत्यास | ०-६०<br>०-९५<br><br>०-६०<br>२-१५ | उतराई<br>घोडा चाळणी करणे पसरणे व ढीग घालणे<br>काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदार कडून |
| २८(१) (इ) (२) बी) १) | हमाली | बाजरी,गहु,ज्वारी,तांदुळ,मुग,तुर,हरभरा, उडीद, जवस, मका,मटकी, तीळ, हळद,वरई, चवळी, अंबाडी, मोहरी, मेथी, चिंचोका, सावा, वाटाणा | ५० किलोपर्यतच्या पिशवीस / पोत्यास | ०-६०<br>०-९५<br><br>०-६०<br>२-१५ | उतराई<br>घोडा चाळणी करणे पसरणे व ढीग घालणे<br>काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदार कडून |
| २८(१) (इ) (२) बी)२) | हमाली | चवळी,वटाणा गहू, तांदूळ. | ५० किलोपर्यतच्या पिशवीस | ०-६५<br>०-८५<br>१-५० | उतराई<br>काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदार कडून |
| २८(१) (इ) (२) सी)१) | हमाली | शेंग | प्रत्येक पोत्यास | ०-७०<br>१-१५<br><br>०-७०<br>२-५५ | उतराई<br>पसरणे ढीग घालणे एक पान चाळणी करणे. काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदार कडून |
| २८(१) (इ) (२) सी)२) | हमाली | धने | प्रत्येक पोत्यास | ०-७०<br>१-८५<br><br>०-७०<br>३-२५ | उतराई<br>घोडा चाळणी करणे पसरणे व ढीग घालणे,काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदार कडून |



Scanned with OKEN Scanner

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| २८(१) (इ) (२) डी)१) अ) | हमाली | मिरची | १ ते ४० किलो पर्यंतच्या प्रत्येक पोत्यास | ०-९५<br>१-३५<br>०-७५<br>३-०५ | उतराई<br>पसरणे व ढीग घालणे काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) डी)१) ब) | | | | | | |
| २८(१) (इ) (२) डी)२) | हमाली | मिरची | प्रत्येक पोत्यास | १-५० | चाकी करणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) इ)१) | हमाली | कापूस | प्रत्येक पोत्यास | ०-९५<br>०-९५<br><br>१-१५<br>३-०५ | उतराई<br>ढीग घालणे<br>काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) इ)२) | | | | | | |
| २८(१) (इ) (२) ३) | हमाली | कांदा | ५० किलो पिशवीस | १-९० | उतरविणे, ढीग घालणे काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) ४) | | | | | | |
| २८(१) (इ) (२) ५)अ) | हमाली | गूळ | १५ किलो पर्यंतच्या वजनाच्या डागास | ०-४० | उतराई | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) ब) | हमाली | गूळ | १५ किलो पासून ३५ किलो वजनाच्या डागास | ०-७० | उतराई | विक्रीदारा कडून |



Scanned with OKEN Scanner

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| २८(१) (इ) (२) क) | हमाली | गूळ | १५ किलो पर्यंतच्या वजनाच्या डागास | ०-४० | सौदयात दाखविणे पालटणीसह व काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) ड) | हमाली | गूळ | १५ किलो पासून ३५ किलो वजनाच्या डागास | ०-७० | सौदयात दाखविणे पालटणीसह व काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) इ) | हमाली | गूळ | प्रत्येक ढेपीस | ०-५५ | स्त्री हमाल पाला पाचोळा काढणे, काटा धरणे, डाग फुटल्यास गोळा करुन पोत्यात भरणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) एफ) | हमाली | तंतूमय शेतीमाल धान्ये, व्दिदल धान्ये, गळीत धान्ये,हळद, मिरची, धने, लसूण, चिंच व कांदे, वरई, सावा,चवळी, वाटाणा अंवाडी, एरंडी,मोहरी, मेंथी, सुर्यफुलबी,चिंचोका | ५० किलो पिशवी / पोत्यास | ०-४० | स्त्री हमाल, शेतीमाल साफसफाई करीता | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) जी)(१) | हमाली | चिंच, लसूण, बटाटे, रताळी | ५० किलो पिशवीस | १-९० | माल उतरविणे, लावणे, ढीग घालणे, काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) | हमाली | केळी | क्विंटलास | ३-२० | माल उतरविणे, लावणे, ढीग घालणे, काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदारा कडून |



Scanned with OKEN Scanner

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| २८(१) (इ) (२) | हमाली | केळी | क्विंटलास | ३-३० | पट्टीत घालणे, छाटणी करणे व लावणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) | हमाली | केळी | क्विंटलास | २-९० | माल काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) जी)३) | हमाली | विडयाची पाने | करंडीस | ०-७० | माल उतरविणे व लावणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) | हमाली | विडयाची पाने | डागास | १-१५ | माल उतरविणे व लावणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) जी) ४) | हमाली | पेठ, हिरवी मिरची, गवारी, भेंडी वांगी दोडके, घेवडा, तोंडले, कारले, काकडी,टोमॅटो, गाजर, मुळ्याच्या शेंगा, बोरे, आले व सर्व प्रकाराची फुले | १० किलोस | १-१५ | माल उतरविणे व लावणे, ढीग घालणे, काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) ५) | हमाली | द्राक्षे | पेटी / पाटीस ४ किलोस | ०-५५ | माल उतरविणे व लावणे, काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) | हमाली | द्राक्षे | करंडीस /२० किलोस | १-७० | माल उतरविणे व लावणे, काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) ६) | हमाली | आंबे, खरबूज, कलिंगडे | क्विंटलास | ३-८० | माल उतरविणे, लावणे, ढीग घालणे, काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदारा कडून |



Scanned with OKEN Scanner

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| २८(१) (इ) (२) | हमाली | आंबे | टोपलीस | १-७० | माल उतरविणे,लावणे व ढीग घालणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) | हमाली | आंबे | करंडीस | १-१५ | माल उतरविणे व ढीग घालणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) | हमाली | आंबे, खरबूज, कलिंगडे | बैलगाडीस ( ५ क्विंटलास ) | १९-७० | माल उतरविणे, लावणे, ढीग घालणे, काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) ६)ब) | हमाली | सिताफळे | क्विंटलास | ३-८० | माल उतरविणे, लावणे, ढीग घालणे, काट्यावर चढविणे व उतरविणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) ६)क) | हमाली | डाळींब,चिक्कू, पपई, सफरचंद | करंडी /पेटीस / क्रेटस | १-३५ | माल उतरविणे , लावणे, ढीग घालणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) ६)इ) | हमाली | मोसंबी, संत्री | १०० नगास | २-९० | माल उतरविणे , लावणे, व ढीग घालणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) ७) | हमाली | आंबे मद्रास | करंडीस | १-४० | माल उतरविणे , लावणे, व ढीग घालणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) ८) | हमाली | लिंबू | १० किलोस | ०-९५ | माल उतरविणे, काट्यावर चढविणे व काढणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) ९) | हमाली | काशी भोपळा | १ नगास | ०-५५ | माल उतरविणे, लिलावात दाखविणे व काढणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) १०) | हमाली | दुधी भोपळा | १० नगास | १-१५ | माल उतरविणे, लिलावात दाखविणे व काढणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) ११)अ) | हमाली | शेवगा, मुळा, पडवळ | १०० नगास | २-१५ | माल उतरविणे, लावणे व ढीग घालणे | विक्रीदारा कडून |



Scanned with OKEN Scanner

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| २८(१) (इ) (२) ११)ब | हमाली | मक्याचे कणीस, कैरी | १०० नगास | २-१५ | माल उतरविणे, लावणे व ढीग घालणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) १२)अ) | हमाली | फ्लॉवर, नवलकोल | ५० नगास/ ५० किलोस | १-८५ | माल उतरविणे,लावणे, छाटणी करणे,काट्यावर चढविणे, उतरविणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) १२)ब) | हमाली | कोबी | १० किलोस | ०-९५ | माल उतरविणे,लावणे, छाटणी करणे, काट्यावर चढविणे, उतरविणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) १३) | हमाली | पालेभाजी, शेपू, मेथी, अंबाडी, पालक, पातीचे कांदे,चुका, राजगीरा कोथींबर | १०० पेंडीस | २-५५ | माल उतरविणे, लावणे, ढीग घालणे, | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) १३) अ | हमाली | अननस | क्विंटलास | ३-८० | माल उतरविणे, छाटणी करणे, लावणे | विक्रीदारा कडून |
| २८(१) (इ) (२) १४ | हमाली | बेदाणा | १५ किलो बॉक्स | ०-९५ | माल उतरविणे, लिलावात दाखविणे व काढणे. | विक्रीदारा कडून |

एच-खरेदी विक्री करणा-या व्यापा-याकडील हमालीचे दर खालीलप्रमाणे

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| २८(१) (इ) (२) एच)१) | हमाली | नियंत्रित अन्नधान्ये, कडधान्ये, गळीत धान्ये | १ ते ५० किलो पर्यंतच्या प्रत्येक पोत्यास | ०-४० | स्टेशन वॅगन रेल्वे वॅगनने आलेल्या शेतीमालाचे हुंडेकरी हमालाकडून उतराई करुन थप्पी लावून घेणे व फाटलेले पोते शिवणे | खरेदी विक्रीदार व्यापा-या कडून |



Scanned with OKEN Scanner

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| २८(१) (इ) (२) एच)२) | हमाली | नियंत्रित अन्नधान्ये, कडधान्ये, गळीत धान्ये | १ ते ५० किलो पर्यंतच्या प्रत्येक पोत्यास | ०-९५ | भराई पोते वाहनात भरणे | खरेदी विक्रीद व्यापा- कडून |
Scanned with OKEN Scanner

बाजार वर्षास अगर त्याचे भागास रुपये २००/- प्रमाणे विलंबाकार प्लॉटधारकाने समितीकडे भरावयास पाहिजे.

नियम- १२ प्लॉटची कोणत्याही परिस्थितीत विभागणी करता येणार नाही.

नियम- १३ बाजार समितीस सार्वजनिक उपयोगासाठी जरुरी भासल्यास प्लॉट परत घेण्याचा अधिकार राहील.

नियम- १४ प्लॉटधारकाने आवश्यकतेपेक्षा जादा प्लॉट धारण केलेले आढळून आल्यास बांधकाम न केलेले प्लॉटस परत घेण्याचा बाजार समितीस अधिकार राहील.

नियम- १५ भाड्याने दिलेल्या प्लॉटची मालकी नेहमी बाजार समितीस राहील. फक्त प्लॉटची जागा भाडेपट्ट्याने ठरविलेल्या मुदतीपर्यंत वहिवाटण्याचा हक्क प्लॉटधारकास असेल. भाडेपट्ट्यातील मुदतीपूर्वी भाडेकरुस भाडेपट्टा रद्द करुन घेता येणार नाही.

नियम- १६ या उपनियमात दिलेल्या कारणाकरीता बांधकाम न केलेला मोकळा प्लॉट बाजार समितीस परत घ्यावा लागल्यास त्याने भरलेल्या भाडेपट्ट्याने रकमेतून प्लॉटचा कब्जा जाहीर केल्यापासून झालेली वर्षे किंवा वर्षाचा भाग या कालावधी करीता हिशोबाने येणारी रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम व प्लॉटवर बांधकाम केले असल्यास सिध्देश्वर बाजारपेठ ज्यांचे हद्दीत आहे असा राज्य सरकारचा कार्यकारी अभियंता, इमारत व दळणवळण खाते यांजकडून करुन घेण्यात आलेले मुल्यनिर्धारणाने (व्हल्युएशन) येणारी रक्कम या खेरीज बाजार समितीमार्फत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई अगर कोणत्याही प्रकारची रक्कम दिली जाणार नाही व त्याप्रमाणे त्यांचा भाडेकरु यांनी अलहिदा कायदेशीर दस्तऐवज करुन देण्याचा आहे.

नियम- १७ ज्या प्लॉटधारकाने परवान्याचे नुतनीकरण करुन घेतले नाही अगर ज्याचा परवाना मंजूर करण्याचे बाजार समितीने नाकारले आहे. अगर ज्याचा परवाना रद्र करण्यात आला आहे अशा प्लॉटधारकास प्लॉटचा कब्जा ठेवण्याचा हक्क राहणार नाही व बाजार समिती त्यास योग्य ती भरपाई देऊन प्लॉट व इमारतीचा कब्जा परत घेईल किंवा तो प्लॉट व त्यावरील इमारत दुसऱ्या परवानाधारकास हस्तांतर (ट्रान्स्फर) करणेस परवानगी देईल. प्लॉट हस्तांतरणासाठी बाजार समिती ठरवले ती फी भरली पाहिजे.

नियम- १८ प्लॉटधारकाने बाजार समितीचे हे उपनियम, नियम, अटी, ठराव हूकूम यांचा भंग केल्यास किंवा सार्वजनिक आरोग्यास विघातक असे कोणतेही कृत्य केल्यास किंवा परवानगीशिवाय त्याच प्लॉट व इमारतीत गहाण, दान, विक्री, अगर अन्य तऱ्हेने बाजार समितीच्या हक्कास बाधा येईल अशाप्रकारे तबदील केल्यास प्लॉट व इमारत परत घेण्याचा बाजार समितीस अधिकार असेल.



Scanned with OKEN Scanner

नियम- १९ वरील नियम, उपनियम, अटी, दुरुस्त करण्याचा अगर जादा करण्याचा किंवा वगळण्याचा बाजार समितीस अधिकार असेल व असे नियम, उपनियम, प्लॉटधारकावर बंधनकारक राहतील.

नियम- २० वरील कोणत्याही उपनियमांचा भंग प्लॉटधारकाने केल्यास त्याचे भाडेकरु म्हणून असलेले नाते व वरील नियमानुसार त्याला प्राप्त झालेले सर्व हक्क नष्ट करण्याचा हक्क बाजार समितीस आहे. अशावेळी भाडेपट्ट्याच्या मुदतीचा आधार प्लॉटधारकास घेता येणार नाही.

नियम- २१ वरील अटी व शर्ती ह्या भाडेपट्ट्याच्या शर्तीचा भाग राहतील त्यास अधिन राहून भाडेपट्ट्याच्या जादा शर्तीसह प्लॉटधारकाने भाडेपट्टा करुन दिला पाहिजे.

नियम- २२ वरील नियम व उपनियमाच्या अर्थासंबंधी वाद उत्पन्न झाल्यास बाजार समितीचा निर्णय अखेरचा असेल.

---



Scanned with OKEN Scanner

नियम- १ कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूरच्या श्री. सिध्देश्वर बाजार पेठेतील बाजार समितीने बांधलेली १३ दुकाने मिरची या नियंत्रित शेतीमालाचा व्यवहार करणारे बाजार समितीचे परवानाधारक आडते व व्यापारी यांना ९ वर्षे ११ महिने मुदतीच्या भाडेपट्ट्याने जास्तीत जास्त विनव्याजी सुरक्षित रक्कम भरणा-यास भाड्याने देण्यात येतील.

नियम- २ सदर मिरची दुकानाच्या बांधकामाचे क्षेत्र प्लॅटफार्म साईज टॅक्स विरहीत वार्षिक भाडे खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | दुकान नंबर | दुकानाचा आकार (बांधकामाचे क्षेत्र) फुटात | टॅक्स विरहीत वार्षिक भाडे |
|---|---|---|---|
| १ | मिरची दुकाने १ ते १३ | ३० फूट X १० फूट | रुपये ६०००/- |

सदर दुकानाच्या उत्तर बाजूस प्रत्येकी दुकानासाठी १५ x १० फूट या आकाराचे प्लॅटफॉर्म आहे व दक्षिण बाजूसही १५ x १० फूटचे प्लॅटफॉर्म असून सदर प्लॅटफॉर्म ७ x ४ या आकाराचे संडास, बाथरुम प्रत्येक दुकानासाठी बांधलेले आहे.

नियम- ३ सदर दुकानासाठी विनव्याजी अनामत सुरक्षित रक्कम भरण्यासंबंधी लिलाव केला जाईल. लिलावात देऊ केलेली रक्कम विचारात घेऊन लिलाव मंजूर करणेचा विचार केला जाईल. कोणताही लिलाव कारण न दर्शविता मंजूर अगर नामंजूर करणेचा अथवा त्याबाबतीत संबंधीताना वाटाघाटीस बोलावून निर्णय घेणेचा अथवा फेरलिलाव करण्याचा अथवा अन्य त-हेने निर्णय घेणेचा अधिकार बाजार समितीस राहील. लिलावाबाबत जाहीर प्रसिध्दीकरण देण्यात येईल. लिलावात मागणी करणेसाठी प्रत्येक लिलावासाठी रुपये २००/- बयाणा म्हणून लिलावापूर्वी भरली पाहिजे.

नियम- ४ ज्याचे नावाने दुकान मंजूर होईल त्यानी विनव्याजी अनामत सुरक्षित रक्कम भरणेस कळविले पासून १५ दिवसाचे आत विनव्याजी अनामत सुरक्षित रक्कम भरली पाहीजे व भाडेपट्टा करुन दिला पाहिजे तसे न केल्यास लिलावात भाग घेणेसाठी भरलेली बयाणा रक्कम डुल होईल व ती बाजार समितीत विनशर्त जमी केली जाईल व सर्व करार आपोआप रद्द होतील.

नियम- ५ एका परवानाधारकास शक्य तो एकच दुकान देण्यात येईल. मात्र एकापेक्षा आधिक दुकानाची आवश्यकता असल्यास ते देणेबाबत बाजार समितीस अधिकार



Scanned with OKEN Scanner

राहील. व्यवसाय चालू असलेल्या परवानाधारकास प्राधान्य देण्यात येईल. दुकान शिल्लक नसल्यास दुकान देणेबाबतची जबाबदारी बाजार समितीवर राहणार नाही.

नियम- ६ नियम नं. २ मध्ये नमूद केलेली दुकान भाड्याची वार्षिक रक्कम भाडेकरुने प्रत्येक बाजार वर्षाचे अखेरीस पुढील बाजार वर्षाचे भाडे आगाऊ भरले पाहिजे. तसे न केल्यास भाडेपट्ट्याची शर्त मोडली असे होऊन भाडेकरुचे नाते नष्ट केले जाण्यास तो भाडेकरु पात्र होईल व दुकानाचा कब्जा घेणेचा अधिकार बाजार समितीस प्राप्त होईल. तसेच वर्षाचे भाडे मुदतीत आगाऊ न भरल्यास भाड्याची प्रत्यक्ष रक्कम देईपर्यंत दर दिवशी १/- ( एक रुपया ) नुकसान भरपाई भाडेकरुनी दिली पाहिजे. वर्ष म्हणजे इंग्रजी कॅलेंडप्रमाणे १ ऑक्टोंबर ते पुढील वर्षाचे ३० सप्टेंबर पर्यंतचे बाजार वर्ष राहील.

नियम- ७ दुकान प्रत्यक्ष ताब्यात दिल्यापासून दुकानाचे भाडे चालू होईल. सदर तारखेपासून त्या वर्षाअखेर पर्यंतचे भाडे निर्धारीत दरास अनुसरुन होणा-या हिशोबाप्रमाणे घेण्यात येईल.

नियम- ८ दुकान कब्जात घेतलेपासून दुकानाचे निर्धारीत भाडे व्यतिरिक्त शासनाने व महापालिकेचे सर्व प्रकारचे कर, आकार, फी, बिगर शेतसारा, भाडेकरुनी परस्पर भरले पाहिजे. तसेच लाईट बील, भाडेकरुनी परस्पर भरले पाहिजे. अशा प्रकारचे कर, आकार, फी वगैरे बाजार समितीस द्यावी लागल्यास ती रक्कम शेकडा १० टक्के व्याज आकारुन भाडेकरुकडून वसूल करण्यात येईल.

नियम- ९ भाडेकरुनी अटी व शर्तीनुसार दुकानाचे भाडे न दिल्यास त्यावरील नुकसानीसह अगर शासनाचे व महापालिकेचे कोणतेही कर, आकार, फी वगैरे बाजार समितीस भरावी लागल्यास त्यावरील व्याजासह अगर बाजार समितीच्या मालमत्तेचे नुकसान केल्यास त्याचे भरपाईसह होणारी रक्कम भाडेकरुकडून कायदेशी मार्गाने अथवा त्यानी भरलेल्या बिनव्याजी अनामत सुरक्षित रक्कमेतून वसूल करणे असे अधिकार बाजार समितीस राहतील. व त्याचा अम्मल बाजार समितीस आपल्या मर्जीनुसार करील.

नियम- १० अनामत सुरक्षित रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही. ही अनामत सुरक्षित रक्कम भाडेपट्टयाच्या मुदतीपर्यंत बाजार समितीकडे राहील. ही रक्कम मुदतीपूर्वी परत मागणेचा अधिकार भाडेकरुस राहणार नाही.

नियम- ११ सदर दुकानाचा उपयोग मिरची या नियंत्रित शेतमालाचा व्यवहार करणेसाठी केला पाहिजे.

नियम- १२ दुकानाचा उपयोग ज्या कारणासाठी दुकान भाड्याने दिले आहे त्याकरीताच करणेचा आहे. अन्य कारणासाठी दुकानाचा वापर करता येणार नाही.

नियम- १३ दुकानाची कोणत्याही परिस्थितीत विभागणी करता येणार नाही.



Scanned with OKEN Scanner

नियम- १४ भाडेकरुने स्वखर्चाने भाडेपट्टा रजिस्टर करुन दिला पाहिजे. मुदतीत भाडेपट्टा करुन घेतल्यास अगर भाडेकरुस भाडेपट्टा करुन घेता येत नाही असे दिसून आल्यास दुकान भाड्याने देणेसंबंधी झालेले सर्व करार आपोआप रद्द होतील.

नियम- १५ बाजार समितीने भाडेकरुची अनुज्ञप्ती रद्द केल्यास किंवा अनुज्ञप्तीचे नुतनीकरण नाकारल्यास किंवा भाडेकरुचा व्यवसाय बंद झाल्यास भाडेकरुने दुकान बाजार समितीच्या ताब्यात दिले पाहिजे न दिल्यास सक्तीने ताबा घेण्याचा अधिकार बाजार समितीस राहील.

नियम- १६ दुकान स्वच्छ व सुरक्षित ठेवणेची जबाबदारी भाडेकरुची राहील. सदरहू दुकानामध्ये रंग सफेदी, किरकोळ दुरुस्ती भाडेकरुनी स्वखर्चाने करण्याचे आहे. किरकोळ दुरुस्तीस बाजार समितीची पूर्व परवानगी घ्यावी लागेल.

नियम- १७ सदर दुकानात पोटभाडेकरु ठेवणेचा नाही. भाड्याने दिलेल्या दुकान गाळ्याची मालकी नेहमी बाजार समितीकडे राहील. फक्त दुकान भाडेपट्ट्याने दिलेल्या मुदतीपर्यंत वहिवाटण्याचा हक्क भाडेकरुस असेल. भाडेपट्ट्याच्या मुदतीपूर्वी भाडेकरुस भाडेपट्टा रद्द करुन घेता येणार नाही.

नियम- १८ कोणत्याही दुकानधारकाने बाजार समितीचे अटी व शर्ती नियम, उपनियम, ठराव हूकुम याचा भंग केल्यास किंवा सार्वजनिक आरोग्यास विघातक असे कोणतेही कृत्य केल्यास किंवा दुकान इमारत गहाण, दान, विक्री, अगर अन्य त-हेने कोणत्याही प्रकारचे तबदील अथवा हस्तांतर केल्यास त्याचे दुकान परत घेण्याचा अधिकार बाजार समितीस राहील.

नियम- १९ बाजार समितीचे सर्व प्लॉटस सरकारी कर्जापोटी गहाण, ठेवले असल्यामुळे सदरहू गहाणखताचे दस्तातील बंधनास पात्र राहून सध्याच्या व वेळोवेळीच्या म्हणजेच यापुढेही कर्जापोटी अगर अन्य त-हेने गहाण, तबदील केल्यास त्यातीलही अटी व शर्तीस पात्र राहून दुकाने भाड्याने देण्यात येतील. गहाण खताच्या नकला पहावयास मिळतील.

नियम- २० सदर दुकानात कोणत्याही प्रकारचा फेरफार अगर बदल करता येणार नाही.

नियम- २१ भाडेपट्ट्याची मुदत संपताक्षणीच भाडेकरुनी दुकान बाजार समितीच्या ताब्यात सुरक्षितपणे दिले पाहिजे. भाडेपट्टा मुदतीनंतर दुकान पाहिजे असल्यास भाडेपट्ट्याची मुदत संपण्यापूर्वी सहा महिने अगोदर लेखी अर्ज करुन दुकानाची मागणी केली पाहिजे. त्यावेळच्या परिस्थितीनुसार व बाजार भावानुसार बाजार समिती दुकानाचे भाडे ठरवील विनव्याजी अनामत सुरक्षित रक्कम देणेबाबत तसेच दुकान भाड्याने देणेबाबतचे नियम, अटी व शर्तीमध्ये फेरबदल करेल ते भाडेकरुस मान्य असेल तर त्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. त्याप्रमाणे त्याने स्वखर्चाने भाडेपट्टा करुन द्यावा लागेल.



Scanned with OKEN Scanner

नियम- २२ भाडेकरुने शेतीमालाचे व्यवहार न करता जागा अडविलेली आहे असे बाजार समितीच्या निदर्शनास आल्यास दुकानाचा कब्जा घेणेचा अधिकार बाजार समितीस राहील.

नियम- २३ भाडेकरुचा व्यवसाय बंद झाल्यास अथवा भाडेकरुची अनुज्ञप्ती बाजार समितीने रद्द केल्यास अथवा नुतनीकरण नाकारल्यास अथवा भाडेकरुने वरील कोणत्याही अटी व शर्ती व उपनियमांचा भंग केल्यास त्याचे भाडेकरु म्हणून असलेले नाते व उपनियमानुसार प्राप्त झालेले सर्व हक्क नष्ट करण्याचा अधिकार बाजार समितीस राहील. अशावेळी भाडेकरुस भाडेपट्टा मुदतीचा आधार घेता येणार नाही.

नियम- २४ वरील अटी व शर्ती, उपनियम, दुरुस्त करण्याचा किंवा नवीन नियम करण्याचा किंवा ते वगळण्याचा अधिकार बाजार समितीस असेल व अशा अटी, शर्ती, उपनियम भाडेकरुवर बंधनकारक राहतील.

नियम- २५ वरील अटी, शर्ती, उपनियम हे भाडेपट्ट्याच्या शर्तीचा भाग राहतील त्यास अधिन राहून भाडेपट्ट्याच्या जादा शर्तीसह भाडेकरुनी भाडेपट्टा करुन दिला पाहिजे.

नियम- २६ वरील अटी, शर्ती व उपनियमाच्या अर्थासंबंधी वाद उत्पन्न झाल्यास बाजार समितीचा निर्णय अखेरचा असेल.

---



Scanned with OKEN Scanner

## श्री. सिध्देश्वर सहकारी बँक लि. सोलापूर यांना प्लॉट भाड्याने देणेबाबतचे उपविधी ५८ (१०) खालील उपनियम.

नियम- १ श्री. सिध्देश्वर बाजारपेठेतील भुसार बाजारातील फळे व भाजीपाला बाजार विभागातील समोरील दक्षिणेकडील ६००० चौ. फूटाची खुली जागा (प्लॉट) श्री. सिध्देश्वर सहकारी बँक लि. सोलापूर यांना भाडेपट्ट्याने देण्यात येईल.

नियम- २ अ) बाजार समिती प्रथमतः ३० वर्षाच्या कराराने जागा भाड्याने देईल. मात्र ती मुदत २ वेळा ३० वर्षाने नुतनीकरण करुन मिळेल मात्र भाडेपट्टा रिन्यु करुन देणे हे प्लॉटधारकाच्या मर्जीवर राहील. ब) भाडेची मुदत वाढवून घेण्याची प्लॉटधारकांची इच्छा असल्यास त्याची ३० वर्षाची मुदत संपण्यापूर्वी लगतचे सहा महिन्यात अगोदर लेखी नोटीस दिली पाहिजे. क) प्लॉटची भाड्याची मुदत वाढवून घेण्याची इच्छा असणा-या प्लॉटधारकांनी त्या जागेचे सर्व देणेभाडे व देणे इतर आकारणी भरली पाहीजे. ड) प्लॉटधारकाने बांधकाम व इतर स्ट्रक्चर पुढील ३० वर्षापर्यंत टिकेल या पध्दतीने दुरुस्ती केली पाहिजे. इ) बाजार समिती प्लॉटची मुदत वाढवून देईल मात्र आजूबाजूचे हद्दीतील त्यावेळी प्रचलित असतील. ते भाडे विचारात घेवून प्लॉटचे भाडे वाढविण्याचा अधिकार बाजार समितीस राहील.

नियम- ३ सदरच्या ६००० चौ. फूट प्लॉटचे वार्षिक भाडे दर चौ. फूटास ५० पैसे राहील. वर्ष म्हणजे इंग्रजी कॅलेंडर प्रमाणे १ ऑक्टोंबर ते पुढील वर्षाचे ३० सप्टेंबर पर्यंतचे मार्केट वर्ष राहील. नियम- ४ वार्षिक भाडे भरणा-या भाडेकरुने दर सप्टेंबर महिन्यात पुढील मार्केट वर्षाचे भाडे आगाऊ भरले पाहिजे. भाडे सप्टेंबर अखेरीस न दिल्यास भाडेची प्रत्यक्ष रक्कम देई पर्यंत दर दिवशी ५० पैसे प्रमाणे नुकसान भरपाई प्लॉटधारकाने दिली पाहिजे. ३० वर्षाचे एकुण भाडे भरणा-या भाडेकरुनी मुदत संपणा-या अखेरच्या मार्केट वर्षात पुढील ३० वर्षाचे भाडे आगाऊ भरले पाहिजे.

नियम- ५ सदर सर्व प्लॉटस सरकारी कर्जापोटी गहाण ठेवलेले असल्याने सदर गहाण खताचे दस्तातील बंधनास पात्र राहून सध्याच्या व वेळोवेळच्या म्हणजेच यापुढेही कर्जापोटी अगर अन्य त-हेने तबदील केल्यास त्यातीलही अटीस पात्र राहून भाड्याने देण्यात येईल. गहाण खताचे नकला पहावयास मिळेल.

नियम- ६ नियम २ ला अनुसरुन बाजार समितीने ठरविलेल्या नमुन्यात अर्ज केला पाहिजे व भाडे भरले पाहिजे. प्लॉट शिल्लक नसल्यास प्रत्यक्ष व्यवसाय करणा-या परवानाधारकांना प्लॉट देण्याची जबाबदारी बाजार समितीवर राहणार नाही.

नियम- ७ प्लॉट देण्याची पध्दत बाजार समिती ठरवील ती राहील त्यानुसार जो प्लॉट ज्याला देण्यात येईल तो त्यांना घ्यावा लागे.

नियम- ८ बाजार समिती जाहीर करील त्या तारखेच्या आत भाडेपट्टा भाडेकरुनी करुन घेतला पाहिजे. प्लॉटचा प्रत्यक्ष कब्जा ज्या तारखेस भाडेपट्टा रजिस्टर करण्यात



Scanned with OKEN Scanner

येईल त्याच दिवशी देण्यात येईल. त्याप्रमाणे भाडेपट्टा करुन न घेतल्यास भाड्यासंबंधी झालेले सर्व करार आपोआप रद्द होतील. व अर्जासोबत भरलेली भाड्याची रक्कम मार्केट कमिटीकडे जुल होईल. व ती रक्कम परत मागणेचा भाडेकरुस अधिकार राहणार नाही. प्लॉट प्रत्यक्ष ताब्यात दिल्यापासून अगर बाजार समिती जी तारीख कळविल त्या तारखेपासून प्लॉटचे भाडे चालू होईल. सदर तारखेपासून त्या मार्केट वर्षातील वर्ष अखेरपर्यंतचे भाडे नियम-३ मधील भाड्यास अनुसरुन हिशोबाप्रमाणे देण्यात येईल व उरलेली रक्कम परत करण्यात येईल.

नियम- ९ भाडेपट्टा करुन देणेकरता मुद्रांकित कागद वगैरे सर्व खर्च प्लॉट घेवू इच्छिणा-याने केला पाहिजे. प्लॉट कब्जात दिल्यापासून सरकारचे व महानगरपालिकेचे सर्व प्रकारचे कर, आकार, फी , सारा प्लॉटधारकांनी परस्पर भरले पाहिजे. अशा प्रकारचे कर बाजार समितीस द्यावा लागल्यास ती रक्कम शेकडा ९ टक्के व्याजाने प्लॉटधारकाकडून वसूल करण्यात येईल. प्लॉटधारकास भाडेपट्टा करुन घेता येत नाही. असे दिसून आल्यास झालेले सर्व करार आपोआप रद्द होतील.

नियम- १० सदर प्लॉटचा उपयोग बँकिंग व्यवसायासाठी करावयाचा आहे. सदर प्लॉटचा उपयोग बाजार समितीने प्लॉट ज्या कारणासाठी दिला आहे. त्यासाठीच करणेचा आहे. सदर प्लॉट मध्ये इतर कोणत्याही प्रकारचा व्यवसाय अगर साठा करता येणार नाही.

नियम- ११ प्लॉट कब्जेत घेतलेपासून एक वर्षाचे आत प्लॉटधारकाने प्लॉटवर करावयाचे बांधकामाचे नकाशे व स्पेसिफिकेशन बाजार समिती, सोलापूर महानगरपालिका आणि अन्य कार्यालये यांचेकडून सम्मत करुन घेवून बाजार समितीने ठरविलेल्या नमुन्यानुसार बांधकाम पूर्ण करावयास पाहिजे. योग्य कारणाकरीता मुदत वाढ मागण्यात आली आहे अशी खात्री झालेस ही मुदत बाजार समिती वाढवू शकेल. मात्र अशी मुदत वाढ मागण्यात आली आहे अशी खात्री झालेस ही मुदत बाजार समिती वाढवू शकेल. मात्र अशी मुदत वाढ २ वर्षापेक्षा अधिक राहणार नाही. बांधकामास फेरफार अगर बांधकाम दुरुस्ती करावयाची असल्यास बाजार समितीची व सोलापूर महानगरपालिकेची मंजूरी घेतली पाहिजे. बांधकाम मुदतीत पूर्ण न केल्यास प्रत्येक बाजार वर्षास अगर त्याचे भागास रुपये १००/- प्रमाणे विलंब आकार प्लॉटधारकाने समितीकडे भरावयास पाहिजे.

नियम- १२ प्लॉटची कोणत्याही परिस्थितीत विभागणी करता येणार नाही.

नियम- १३ बाजार समितीस सार्वजनिक उपयोगासाठी जरुरी लागल्यास प्लॉट परत घेण्याचा अधिकार राहील.

नियम- १४ प्लॉटधारकाने आवश्यकतेपेक्षा जादा प्लॉट धारण केलेले आढळून आलेस बांधकाम न केलेले प्लॉटस परत घेण्याचा बाजार समितीस अधिकार राहील.



Scanned with OKEN Scanner

नियम-१५ प्लॉटधारकाने बाजार समितीचे हे उपनियम, नियम, अटी, ठराव व हुकूम यांचा भंग केल्यास किंवा सार्वजनिक आरोग्यास विघातक असे कोणतेही कृत केल्यास किंवा परवानगी शिवाय त्यांच्या प्लॉट व इमारतीत पोट भाडेकरु ठेवल्यास किंवा प्लॉट किंवा इमारत गहाण, दान विक्री अगर अन्य त-हेने बाजार समितीच्या हक्कास बाध येईल अशा प्रकारे तबदील केल्यास त्याचा प्लॉट व इमारत परत घेण्याचा बाजार समितीस अधिकार असेल.

नियम- १६ भाड्याने दिलेल्या प्लॉटची मालकी नेहमी बाजार समितीस राहील. फक्त प्लॉटची जागा भाडेपट्ट्याने ठरविलेल्या मुदतीपर्यंत वहिवाटण्याचा हक्क प्लॉटधारकांस असेल. भाडेपट्ट्यातील मुदतीपूर्वी भाडेकरुस भाडेपट्टा रद्द करुन घेता येणार नाही.

नियम- १७ या उपनियमात दिलेल्या कारणाकरीता बांधकाम न केलेला मोकळा प्लॉट बाजार समितीस परत घ्यावा लागल्यास त्यानी भरलेल्या भाडेपट्ट्याचे रकमेतून प्लॉटचा कब्जा जाहीर केल्यापासुन झालेली वर्ष किंवा वर्षाचा भाग या कालावधीकरीता हिशोबाने येणारी रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम व प्लॉटवर बांधकाम केले असल्यास भुसार बाजार ज्याचा हद्दीत आहे. अशा राज्य सरकारचा कार्यकारी अभियंता, इमारत व दळणवळण खाते यांजकडुन करुन घेण्यात आलेले मुल्य निर्धारणआने (व्हॅल्यूएशन) येणारी रक्कम या खेरीज बाजार समितीतर्फे कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई अगर कोणत्याही प्रकारची रक्कम दिली जाणार नाही व त्याप्रमाणे त्याचा भाडेकरु यांनी अलहीदा कायदेशीर दस्त ऐवज करुन देण्याचा आहे.

नियम- १८ वरील नियम, उपनियम, अटी दुरुस्त करण्याचा अगर जादा करण्याचा किंवा वगळण्याचा बाजार समितीस अधिकार असेल व असे नियम व उपनियम प्लॉटधारकावर बंधनकारक राहतील.

नियम- १९ वरील कोणत्याही उपनियमाचा भंग प्लॉटधारकांनी केल्यास त्याचे भाडेकरु म्हणून असलेले नाते व वरील नियमानुसार त्याला प्राप्त झालेला सर्व हक्क बाजार समितीस आहे. अशावेळी भाडेपट्ट्याच्या मुदतीचा आधार प्लॉट धारकांस घेता येणार नाही.

नियम- २० वरील अटी व शर्ती ह्या भाडेपट्ट्याच्या शर्तीचा भाग राहतील. त्यास अधिन राहून भाडेपट्ट्याच्या जादा शर्तीसह प्लॉटधारकांने भाडेपट्टा करुन दिला पाहिजे.

नियम- २१ वरील नियम व उपनियमाच्या अर्थासंबंधी वाद उत्पन्न झाल्यास बाजार समितीचा निर्णय अखेरचा असेल.

---



Scanned with OKEN Scanner

**भुसार बाजारातील गोडावून लगतचे दुकाने भाडयाने देणेबावतचे उपविधी ५८(१०) खालील उपनियम**

---

नियम- १ कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूरच्या श्री. सिध्देश्वर बाजारपेठेतील भुसार बाजारातील गुळ व इतर मालाचे गोडावून लगतचे दुकाने नियंत्रित शेतीमालाचा व्यवहार करणारे बाजार समितीचे परवानाधारक आडते व व्यापारी यांना ९ वर्षे ११ महिने मुदतीच्या भाडेपट्ट्याने जास्तीत जास्त विनव्याजी सुरक्षित रक्कम भरणा-यास भाड्याने देण्यात येतील. सुरक्षित रकमेसंबंधी लिलाव काढला जाईल अथवा बाजार समिती ठरवील त्याप्रमाणे सुरक्षित रक्कम भरणा-यास दुकाने देण्यात येतील.

नियम- २ सदर दुकानाचे टॅक्स विरहीत वार्षिक भाडे प्रत्यक्ष बांधकामाचा खर्च, जमिनीची किंमत, आजूबाजूचे भाडे इत्यादी बाबींचा विचार करुन बाजार समिती वेळोवेळी ठरवील ते राहतील.

नियम- ३ सदर दुकानासाठी विनव्याजी अनामत सुरक्षित रक्कम बाजार समिती ठरवील अथाव रक्कम भरण्यासंबंधी लिलाव केला जाईल. लिलावात देऊ केलेली रक्कम विचारात घेवून लिलाव मंजूर करणेचा विचार केला जाईल. कोणताही लिलाव कारण न दर्शविता मंजूर अगर नामंजूर करणेचा अथवा त्याबाबतीत संबंधीतांना वाटाघाटीस बोलावून निर्णय घेणेचा अथवा फेर लिलाव करणेचा अथवा अन्य त-हेने निर्णय घेणेचा अधिकार बाजार समितीस राहील. लिलाव फॉर्म लिलावात मागणीसाठी बयाणा रक्कम वगैरे बाबीसंबंधीचे नियम बाजार समिती ठरवील. लिलावाचे प्रसिध्दीकरण करण्यात येईल.

नियम- ४ सदरहू दुकानाचा नकाशा पाहून व जागा व त्याचे क्षेत्र, बांधकाम वगैरे समक्ष पाहून खात्री करुन घेवून लिलावात भाग घेतला पाहिजे. अथवा दुकानाची मागणी केली पाहिजे.

नियम- ५ ज्यांचे नावाने दुकान मंजूर होईल त्यांनी बिनव्याजी अनामत सुरक्षित रक्कम भरणेस कळविले पासून पंधरा दिवसाचे आत बिनव्याजी अनामत सुरक्षित रक्कम भरली पाहिजे व भाडेपट्टा करुन दिला पाहिजे. तसे न केल्यास लिलावात भाग घेणेसाठी भरलेली बयाणा रक्कम डुल होईल व ती बाजार समितीत बिनशर्त जमा केली जाईल व सर्व करार आपोआप रद्द होतील.

नियम- ६ एका परवानाधारकास शक्यतो एकच दुकान देण्यात येईल. मात्र एकापेक्षा अधिक दुकानाची आवश्यकता असल्यास ते देणेबावत बाजार समितीस, अधिकार राहतील. व्यवसाय चालू असलेल्या परवानाधारकांस प्राधान्य देण्यात येईल. दुकान शिल्लक नसल्यास दुकान देणेबाबतची जबाबदारी बाजार समितीवर राहणार नाही.



Scanned with OKEN Scanner

नियम- ७ नियम नं. २ प्रमाणे ठरविलेली दुकान भाड्याची वार्षिक रक्कम भाडेकरुने प्रत्येक बाजार वर्षाचे अखेरीस पुढील बाजार वर्षाचे भाडे आगाव भरले पाहिजे. तसे न केल्यास भाडेपट्ट्याची शर्त मोडली असे होवून भाडेकरुचे नाते नष्ट केले जाण्यास तो भाडेकरु पात्र होईल व दुकानाचा कब्जा घेणेचा अधिकार बाजार समितीस प्राप्त होईल. तसेच वर्षाचे भाडे मुदतीत आगाव न भरल्यास भाड्याची प्रत्यक्ष रक्कम देईपर्यंत दर दिवशी एक रुपया नुकसान भरपाई भाडेकरुनी दिली पाहिजे.

वर्ष म्हणजे इंग्रजी कॅलेंडर प्रमाणे १ ऑक्टोबर ते पुढील वर्षाचे ३० सप्टेंबर पर्यंतचे बाजार वर्ष राहील.

नियम- ८ दुकान प्रत्यक्ष ताब्यात दिल्यापासून दुकानाचे भाडे चालू होईल. सदर तारखेपासून त्या वर्षअखेर पर्यंतच भाडे निर्धारीत दरास अनुसरुन होणा-या हिशोबाप्रमाणे घेण्यात येईल.

नियम- ९ दुकान कब्जात घेतलेपासून दुकानाचे निर्धारीत भाडे व्यतिरिक्त शासनाने व महापालिकेचे सर्व प्रकारचे कर, आकार, फी, बिगर शेतसारा, भाडेकरुनी परस्पर भरले पाहिजे. तसेच लाईट बील भाडेकरुनी परस्पर भरले पाहिजे. अशा प्रकारचे कर, आकार, फी वगैरे बाजार समितीस द्यावी लागल्यास ती रक्कम शेकडा दहा टक्के व्याज आकारुन भाडेकरुकडून वसूल करण्यात येईल.

नियम- १० भाडेकरुनी अटी व शर्तीनुसार दुकानाचे भाडे न दिल्यास त्यावरील नुकसानीसह अगर शासनाचे अगर महापालिकेचे कोणतेही कर, आकार, फी वगैरे बाजार समितीस भरावी लागल्यास त्यावरील व्याजासह अगर बाजार समितीच्या मालमत्तेचे नुकसान केल्यास त्याचे भरपाईसह होणारी रक्कम भाडेकरुकडून कायदेशीर मार्गाने अथवा त्यानी भरलेल्या विनव्याजी अनामत सुरक्षित रकमेतून वसुल करणे असे दोन्ही अधिकार बाजार समितीस राहतील व त्याचा अम्मल बाजार समिती आपल्या मर्जीनुसार करील.

नियम- ११ अनामत सुरक्षित रकमेवर व्याज दिले जाणार नाही. ही अनामत सुरक्षित रक्कम भाडेपट्ट्याच्या मुदतीपर्यंत बाजार समितीकडे राहील ही रक्कम मुदतीपूर्वी परत मागणेचा अधिकार भाडेकरुस राहणार नाही.

नियम- १२ सदर दुकानाचा उपयोग नियंत्रित शेतीमालाचा व्यवहार करणेसाठी केला पाहिजे.

नियम- १३ दुकानाचा उपयोग ज्या कारणासाठी दुकान भाड्याने दिले आहे. त्याकरीताच करणेचा आहे. अन्य कारणासाठी दुकानाचा वापर करता येणार नाही.

नियम- १४ सदर दुकानात कोणत्याही आक्षेपार्ह मालाचा व्यवसाय अगर साठा करता येणार नाही व सदरहू दुकानात सार्वजनिक आरोग्यास विघातक असे कृत्य करता येणार नाही.

नियम- १५ दुकानाची कोणत्याही परिस्थितीत विभागणी करता येणार नाही.



Scanned with OKEN Scanner

नियम- १६ भाडेकरुने स्वखर्चाने भाडेपट्टा रजिस्टर करुन दिला पाहिजे. मुदतीत भाडेपट्टा करुन न घेतल्यास अगर भाडेकरुस भाडेपट्टा करुन घेता येत नाही असे दिसून आल्यास दुकान भाड्याने देणेसंबंधी झालेले सर्व करार आपोआप रद्द होतील.

नियम- १७ बाजार समितीने भाडेकरुची अनुज्ञप्ती रद्द केल्यास किंवा अनुज्ञप्तीचे नुतनीकरण नाकारल्यास किंवा भाडेकरुचा व्यवसाय बंद झाल्यास भाडेकरुने दुकान बाजार समितीच्या ताब्यात दिले पाहिजे न दिल्यास दुकानाचा व्यवसाय बंद झाल्यास भाडेकरुने दुकान बाजार समितीच्या ताब्यात दिले पाहिजे न दिल्यास दुकानाचा सक्तीने ताबा घेण्याचा अधिकार बाजार समितीस राहील.

नियम- १८ दुकान स्वच्छ व सुरक्षित ठेवणेची जबाबदारी भाडेकरुची राहील. सदरहू दुकानामध्ये रंग सफेदी, किरकोळ दुरुस्ती भाडेकरुनी स्वखर्चाने करण्याचे आहे. किरकोळ दुरुस्तीस बाजार समितीची पूर्व परवानगी घ्यावी लागेल.

नियम- १९ सदर दुकानात पोटभाडेकरु ठेवणेचा नाही, भाड्याने दिलेल्या दुकान गाळ्याची मालकी नेहमी बाजार समितीकडे राहील. फक्त दुकान भाडेपट्ट्याने दिलेल्या मुदतीपर्यंत वहिवाटण्याचा हक्क भाडेकरुस असेल भाडेपट्ट्याच्या मुदतीपूर्वी भाडेकरुस भाडेपट्टा रद्द करुन घेता येणार नाही.

नियम- २० कोणत्याही दुकानधारकाने बाजार समितीचे अटी व शर्ती, नियम, उपनियम, ठराव, हूकूम याचा भंग केल्यास किंवा सार्वजनिक आरोग्यास विघातक असे कोणतेही कृत्य केल्यास किंवा दुकान इमारत गहाण, दान, विक्री अगर अन्य त-हेने कोणतेही प्रकारचे तबदील अथवा हस्तांतर केल्यास त्याचे दुकान परत घेण्याचा अधिकार बाजार समितीस राहील.

नियम- २१ बाजार समितीचे सर्व प्लॉटस सरकारी कर्जापोटी गहाण ठेवले असल्यामुळे सदरहू गहाणखताचे दस्तातील बंधनास पात्र राहून सध्याच्या व वेळोवेळीच्या म्हणजेच यापुढेही कर्जापोटी अगर अन्य त-हेने गहाण, तबदील केल्यास त्यातीलही अटी, शर्तीस पात्र राहून दुकाने भाड्याने देण्यात येतील गहाण खताच्या नकला पहावयास मिळतील.

नियम- २२ सदर दुकानात कोणत्याही प्रकारचा फेरफार अगर बदल करता येणार नाही.

नियम- २३ सदर दुकानाच्या भाडेपट्ट्याची मुदत ९ वर्षे ११ महिने राहील. भाडेपट्ट्याची मुदत संपताक्षणीच भाडेकरुनी दुकान बाजार समितीच्या ताब्यात सुरक्षितपणे दिले पाहिजे. भाडेपट्टा मुदतीनंतर दुकान पाहिजे असल्यास भाडेपट्ट्याची मुदत संपण्यापूर्वी सहा महिने अगोदर लेखी अर्ज करुन दुकानाची मागणी केली पाहिजे. त्यावेळच्या परिस्थितीनुसार व बाजारभावानुसार बाजार समिती दुकानाचे भाडे ठरवील. तसेच दुकान भाड्याने देणेबाबतचे नियम, अटी व शर्तीमध्ये योग्य ते फेरबदल करील ते भाडेकरुस मान्य असेल तर त्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. त्याप्रमाणे त्याने स्वखर्चाने भाडेपट्टा करुन द्यावा लागेल.



Scanned with OKEN Scanner

नियम- २४ भाडेकरुने शेतीमालाचे व्यवहार न करता जागा अडविलेली आहे असे बाजार समितीच्या निदर्शनास आल्यास दुकानाचा कब्जा घेणेचा अधिकार बाजार समितीस राहील.

नियम- २५ भाडेकरुचा व्यवसाय बंद झाल्यास अथवा भाडेकरुने वरील कोणत्याही अटी व शर्ती व उपनियमांचा भंग केल्यास त्याचे भाडेकरु म्हणून असलेले नाते व उपनियमानुसार प्राप्त झालेले सर्व हक्क नष्ट करण्याचा अधिकार बाजार समितीस राहील. अशावेळी भाडेकरुस भाडेपट्टा मुदतीचा आधार घेता येणार नाही.

नियम- २६ मुदतीअखेर अथवा बाजार समितीने कोणत्याही कारणामुळे दुकान ताब्यात घेणेचे ठरविल्यास भाडेकरुने आपले सामान काढून घेवून दुकान बाजार समितीच्या ताब्यात दिले पाहिजे. तसे न केल्यास दुकानातील सर्व सामान बाहेर काढून रिकामे दुकान बाजार समिती ताब्यात घेईल. अशा वेळी जरुर पडल्यास दोन पंचासमोर कुलूप अगर कुलूपे तोडून सामान बाहेश काढून दुकान ताब्यात घेणेचा अधिकार बाजार समितीस राहील. भाडेकरुचे सामान बाहेर ठेवल्यामुळे त्याची नुकसानी, खराबी झाल्यास त्याची जबाबदारी बाजार समितीवर राहणार नाही.

नियम- २७ वरील अटी व शर्ती, उपनियम दुरुस्त करण्याचा किंवा नवीन नियम करण्याचा किंवा ते वगळण्याचा अधिकार बाजार समितीस असेल व अशा अटी, शर्ती उपनियम भाडेकरुवर बंधनकारक राहतील.

नियम- २८ वरील अटी, शर्ती व उपनियम हे भाडेपट्ट्याच्या शर्तीचा भाग राहतील. त्यास अधिन राहून भाडेपट्ट्याच्या जादा शर्तीसह भाडेकरुनी भाडेपट्टा करुन दिला पाहिजे.

नियम- २९ वरील अटी, शर्ती व उपनियमाच्या अर्थासंबंधी वाद उत्पन्न झाल्यास बाजार समितीचा निर्णय अखेरचा असेल.

---



Scanned with OKEN Scanner

## डिझेल, पेट्रोल पंपासाठी प्लॉट भाडयाने देणेबाबतचे उपविधी ५८(१०) खालील उपनियम

नियम- १ श्री. सिध्देश्वर बाजारपेठेतील भुसार बाजाराच्या पश्चिमेकडील डिझेल व पेट्रोल पंपासाठी ठेवलेला खुला प्लॉट भाडेपट्ट्याने देण्यात येईल. डिझेल व पेट्रोल पंपासाठी द्यावयाच्या प्लॉटचा आकार, क्षेत्रफळ, जागा बाजार समिती ठरवील त्याप्रमाणे व लेआऊट मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

नियम- २ अ) बाजार समिती प्रथमतः ३० वर्षाच्या कराराने जागा भाड्याने देईल. मात्र ती मुदत दोन वेळा ३० वर्षाने नुतनीकरण करुन मिळेल. मात्र भाडेपट्टा नुतनीकरण करुन घेणे हे प्लॉटधारकाच्या मर्जीवर राहील. ब)भाडेपट्याची मुदत वाढवून घेण्याची प्लॉटधारकाची इच्छा असल्यास त्याने तीस वर्षाची मुदत संपण्यापूर्वी लगतचे सहा महिन्यात अगोदर लेखी नोटीस दिली पाहिजे. क)प्लॉटची भाडेपट्याची मुदत वाढवून घेण्याची इच्छा असणा-या प्लॉटधारकांनी त्या जागेचे सर्व देणे भाडे व इतर देणे व आकारणी, कर, फी, सारा वगैरे भरले पाहिजे. ड)प्लॉटधारकाने बांधकाम व इतर स्ट्रक्चर पुढील तीस वर्षापर्यंत टिकेल यापध्दतीने दुरुस्ती केली पाहिजे. इ)बाजार समिती प्लॉटची मुदत वाढवून देईल. मात्र आजूबाजूचे हद्दीतील त्यावेळी प्रचलित असतील ते भाडे विचारात घेवून प्लॉटचे भाडे वाढविण्याचा अधिकार बाजार समितीस राहील.

नियम- ३ सदर प्लॉटचे वार्षिक भाडे दर चौ. फुटास ५० पैसे राहील. वर्ष इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे १ ऑक्टोंबर ते पुढील वर्षाचे ३० सप्टेंबर पर्यंतचे मार्केट वर्ष राहील.

नियम- ४ प्लॉटधारकाने दर सप्टेंबर महिन्यात पुढील मार्केट वर्षाचे भाडे आगाऊ भरले पाहिजे. भाडे सप्टेंबर अखेरीस न दिल्यास भाड्याची प्रत्यक्ष रक्कम देईपर्यंत दरदिवशी ५० पैसे प्रमाणे नुकसान भरपाई प्लॉटधारकाने दिली पाहिजे.

नियम- ५ सदर प्लॉट सरकारी व इतर कर्जापोटी बाजार समितीने गहाण ठेवल्यास अगर अन्य त-हेने तबदील केल्यास त्यातील अटीस पात्र राहून सदर प्लॉट भाड्याने देण्यात येतील. गहाण खताचे नकला पहावयास मिळतील.

नियम- ६ सदर प्लॉट मिळणेसाठी नियमास अनुसरुन अर्ज केला पाहिजे. व भाडे भरले पाहिजे. तसेच बाजार समिती ठरवील तितकी रक्कम बिनव्याजी अनामत रक्कम म्हणून भरली पाहिजे. बाजार समिती ठरवील त्याप्रमाणे व ठरवील तितक्या मुदतीकरीता अनामत रक्कम बाजार समितीकडे राहील. बिनव्याजी अनामत रक्कम ठरविणेचा व त्याबाबतची पध्दत ठरविणेचा अधिकार बाजार समितीस राहील.

नियम- ७ प्लॉट देण्याची पध्दत बाजार समिती ठरवील ती राहील. त्यानुसार जो प्लॉट ज्याला देण्यात येईल तो त्यांना घ्यावा लागेल. प्लॉट शिल्लक नसल्यास प्लॉट देण्याची जबाबदारी बाजार समितीवर राहणार नाही.



Scanned with OKEN Scanner

नियम- ८ बाजार समिती ठरवील त्या तारखेच्या आत प्लॉटधारकाने भाडेपट्टा करुन घेतला पाहिजे. प्लॉटचा कब्जा ज्या तारखेस भाडेपट्टा करण्यात येईल त्या तारखेस देण्यात येईल. त्याप्रमाणे भाडेपट्टा करुन न घेतल्यास भाड्यासंबंधी झालेले सर्व करार आपोआप रद्द होतील व अर्जासोबत भरलेली भाड्याची रक्कम मार्केट कमिटीकडे डुल होईल व ती रक्कम परत मागण्याचा भाडेकरुस अधिकार राहणार नाही. प्लॉट प्रत्यक्षात ताब्यात दिल्यापासून अगर बाजार समितीस जी तारीख कळविल त्या तारखेपासून प्लॉटचे भाडे चालू होईल. सदर तारखेपासून त्या मार्केट वर्षातील वर्ष अखेरीपर्यंतचे भाडे नियम ३ मधील भाड्यास अनुसरुन हिशोबाप्रमाणे घेण्यात येईल व उरलेली रक्कम परत करण्यात येईल.

नियम- ९ भाडेपट्टा करुन देणेकरीता मुद्रांकित कागद वगैरे सर्व खर्च प्लॉट घेवू इच्छिणा-याने केला पाहिजे. प्लॉटधारकास भाडेपट्टा करुन घेत येत नाही असे दिसून आल्यास प्लॉटसंबंधी झालेले सर्व करार आपोआप रद्द होतील.

नियम- १० प्लॉट कब्जात दिल्यापासून त्या प्लॉटचे सरकारचे व महानगरपालिकेचे सर्व प्रकारचे कर, आकार, फी, सारा प्लॉटधारकाने परस्पर भरले पाहिजे. अशा प्रकारचे कर, आकार, फी, सारा बाजार समितीस द्यावे लागल्यास किंवा भरावे लागल्यास ती रक्कम बाजार समिती ठरवील त्या व्याजदराने आकारणी करुन प्लॉटधारकाकडून वसूल करण्यात येईल.

नियम- ११ सदर प्लॉटपैकी जो प्लॉट पेट्रोल पंपासाठी दिलेला आहे त्या प्लॉटचा उपयोग पेट्रोल पंप व्यवसायासाठी करावयाचा आहे. सद प्लॉटचा उपयोग बाजार समितीने ज्या कारणासाठी अथवा व्यवसायासाठी प्लॉट दिलेला आहे. त्याकारणासाठीच केला पाहिजे. सदर प्लॉटमध्ये इतर कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करता येणार नाही व सद प्लॉटमध्ये कोणत्याही आक्षेपार्ह मालाचा साठा करता येणार नाही.

नियम- १२ प्लॉट कब्जेत घेतलेपासुन एक वर्षाचे आत प्लॉटधारकाने व प्लॉटवर करावयाचे बांधकामाचे नकाशे व स्पेशिफिकेशन बाजार समिती व सोलापूर महानगरपालिका आणि अन्य कार्यालये यांचेकडून संम्मत करुन घेवून बाजार समितीने ठरविलेल्या नमुन्यानुसार बांधकाम पूर्ण करावयास पाहिजे. योग्य कारणाकरीता मुदतवाढ मागण्यात आली आहे अशी खात्री झाल्यास ही मुदत बाजार समिती वाढवू शकेल. मात्र अशी मुदतवाढ दोन वर्षापेक्षा अधिक राहणार नाही. बांधकाम फेरफार अगर बांधकाम दुरुस्ती करावयाची असल्यास बाजार समितीची व सोलापूर महानगरपालिकेची मंजूरी घेतली पाहिजे. बांधकाम मुदतीत पूर्ण न केल्यास प्रत्येक बाजार वर्षास अगर त्याचे भागास रुपये २०० प्रमाणे विलंबाकार प्लॉटधारकाने बाजार समितीकडे भरला पाहिजे.

नियम- १३ प्लॉटची कोणत्याही परिस्थिती विभागणी करता येणार नाही.

नियम- १४ बाजार समितीस सार्वजनिक उपयोगासाठी जरुरी लागल्यास सदरचे प्लॉट परत घेण्याचा अधिकार राहील.



Scanned with OKEN Scanner

नियम- १५ प्लॉटधारकाने आवश्यकतेपेक्षा जादा प्लॉट धारण केलेले आढळून आल्यास प्लॉट परत घेणेचा बाजार समितीस अधिकार राहील.

नियम- १६ प्लॉटधारकास त्याल दिलेले जागेपेक्षा जास्त जागेचा वापर करता येणार नाही.

नियम- १७ प्लॉटधारकाचा व्यवसाय बंद झाल्यास किंवा प्लॉटधारक प्लॉटमध्ये व्यवसाय करीत नसल्याचे बाजार समितीच्या निदर्शनास आल्यास प्लॉटचा कब्जा घेणेचा अधिकार बाजार समितीस राहील.

नियम- १८ प्लॉटधारकास बाजर पेठेतील व्यवहारास अथवा रहदारीस शिस्तीस अडथळा येईल अथवा बाधा येईल अथवा बाजार पेठेतील व्यवहारावर अनिष्ठ परिणाम होईल अशा प्रकारचे कृत्य अथवा व्यवहार करता येणार नाही. अशा प्रकारचे कृत्य अथवा व्यवहार केल्याचे दिसून आल्यास त्याचा प्लॉट परत घेण्याचा अधिकार बाजार समितीस असेल.

नियम- १९ प्लॉटधारकाने बाजार समितीचे हे उपनियम, नियम अटी व ठराव व हूकूम याचा भंग केल्यास किंवा सार्वजनिक आरोग्यास विघातक असे कोणतेही कृत्य केल्यास अथवा परवानगीशिवाय त्यांच्या प्लॉट व इमारतीत पोटभाडेकरु ठेवल्यास किंवा प्लॉट किंवा इमारत गहाण, दान, विक्री अगर अन्य त-हेने बाजार समितीच्या हक्कास बाधा येईल अशा प्रकारचे तबदील केल्यास त्याचा प्लॉट व इमारत परत घेण्याचा बाजार समितीस अधिकार असेल.

नियम- २० भाड्याने दिलेल्या प्लॉटची मालकी नेहमी बाजार समितीची राहील. फक्त प्लॉटची जागा भाडेपट्ट्याने ठरविलेल्या मुदतीपर्यंत वहिवाटण्याचा हक्क प्लॉटधारकास असेल. भाडेपट्ट्यातील मुदतीपूर्वी भाडेकरुस भाडेपट्टा रद्द करुन घेता येणार नाही.

नियम- २१ या उपनियमात दिलेल्या कारणाकरीता बांधकाम न केलेला मोकळा प्लॉट बाजार समितीस परत घ्यावा लागल्यास त्याने भरलेल्या भाडेपट्ट्याचे रकमेतून प्लॉटचा कब्जा दिल्यापासुन झालेली वर्ष किंवा वर्षाच्या भाग या कालावधीकरीता हिशोबाने येणारी रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम व प्लॉटवर बांधकाम केले असल्यास श्री. सिध्देश्वर बाजारपेठ ज्याच्या हद्दीत आहे अशा सरकारचा कार्यकारी अभियंता, इमारत व दळणवळण खाते यांजकडून करुन घेण्यात आलेले मूल्यनिर्धारणाने (व्हॅल्यूएशन) येणारी रक्कम याखेरीज बाजार समितीतर्फे कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई अगर कोणत्याही प्रकारची रक्कम दिली जाणार नाही व त्याप्रमाणे त्याचा भाडेकरु यानी अलहिदा कायदेशीर दस्तऐवज करुन देण्याचा आहे.

नियम- २२ वरील नियम, उपनियम, अटी दुरुस्त करण्याचा अगर जादा करण्याचा किंवा वगळण्याचा बाजार समितीस अधिकार असेल व असे नियम व उपनियम प्लॉटधारकांवर बंधनकारक राहतील.

नियम- २३ वरील कोणत्याही उपनियमांचा भंग प्लॉटधारकाने केल्यास त्याचे भाडेकरु म्हणून असलेले नाते व वरील नियमानुसार त्यास प्राप्त झालेले सर्व हक्क नष्ट करणेचा



Scanned with OKEN Scanner

अधिकार बाजार समितीस आहे. अशा वेळी भाडेपट्ट्याच्या मुदतीचा आधार प्लॉटधारकास घेता येणार नाही.

नियम- २४ वरील अटी व शर्ती या भाडेपट्ट्याच्या शर्तीचा भाग राहतील. त्यास अधिन राहून भाडेपट्ट्याच्या जादा शर्तीसह प्लॉटधारकाने भाडेपट्टा करुन दिला पाहिजे.

नियम- २५ वरील नियम व उपनियमाच्या अर्थासंबंधी वाद उत्पन्न झाल्यास बाजार समितीचा निर्णय अखेरचा असेल.

---



Scanned with OKEN Scanner

**टेलिफोन एक्सचेंजसाठी प्लॉट भाड्याने देणेबाबतचे उपविधी ५८(१०) खालील उपनियम**

नियम- १ श्री. सिध्देश्वर बाजारपेठेतील खुला प्लॉट टेलीफोन एक्सचेंज ऑफीससाठी भाडेपट्ट्याने देण्यात येईल. टेलीफोन एक्सचेंज ऑफीससाठी द्यावयाचा प्लॉटचा आकार, क्षेत्रफळ, जागा बाजार समिती ठरवील त्याप्रमाणे व लेआऊट मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

नियम- २ अ) बाजार समिती प्रथमत: ३० वर्षाच्या कराराने जागा भाड्याने देईल. मात्र ती मुदत २ वेळा ३० वर्षाने नुतनीकरण करुन मिळेल. मात्र भाडेपट्टा नुतनीकरण करुन घेणे हे प्लॉटधारकाच्या मर्जीवर राहील.

ब) भाडेपट्ट्याची मुदत वाढवून घेण्याची प्लॉटधारकांची इच्छा असल्यास त्याने ३० वर्षाची मुदत संपण्यापूर्वी लगतचे सहा महिन्यात अगोदर लेखी नोटीस दिली पाहिजे.

क) प्लॉटची भाडेपट्ट्याची मुदत वाढवून घेण्याची इच्छा असणाऱ्या प्लॉटधारकांनी त्या जागेचे सर्व देणेभाडे व इतर देणे व आकारणी, कर, फी, सारा वगैरे भरले पाहिजे.

ड) प्लॉटधारकाने बांधकाम व इतर स्ट्रक्चर पुढील ३० वर्षापर्यंत टिकेल या पध्दतीने दुरुस्ती केली पाहिजे.

इ) बाजार समिती प्लॉटची मुदत वाढवून देईल मात्र आजूबाजूचे हदीतील त्यावेळी प्रचलित असतील ते भाडे विचारात घेवून प्लॉटचे भाडे वाढविण्याचा अधिकार बाजार समितीस राहील.

नियम- ३ सदर प्लॉटचे वार्षिक भाडे दर चौ. फूटास ५० पैसे राहील. वर्ष म्हणजे इंग्रजी कॅलेंडर प्रमाणे १ ऑक्टोंबर ते पुढील वर्षाचे ३० सप्टेंबर पर्यंतचे मार्केट वर्ष राहील.

नियम- ४ प्लॉटधारकाने दर सप्टेंबर महिन्यात पुढील मार्केट वर्षाचे भाडे आगाऊ भरले पाहिजे. भाडे सप्टेंबर अखेरीस न दिल्यास भाडेची प्रत्यक्ष रक्कम देईपर्यंत दर दिवशी ५० पैसे प्रमाणे नुकसान भरपाई प्लॉटधारकाने दिली पाहिजे.

नियम- ५ सदर प्लॉट सरकारी अगर इतर कर्जापोटी बाजार समितीने गहाण ठेवल्यास अगर अन्य त-हेने तवदील केल्यास त्यातील अटीस पात्र राहून सदर प्लॉट भाड्याने देण्यात येतील. गहाण खताचे नकला पहावयास मिळतील.

नियम- ६ सदर प्लॉट मिळणेसाठी नियमास अनुसरुन अर्ज केला पाहिजे. व भाडे भरले पाहिजे तसेच बाजार समिती ठरवील त्याप्रमाणे व ठरवील तितक्या अनामत रक्कम म्हणून भरली पाहिजे. बाजार समिती ठरवील त्याप्रमाणे व ठरवील तितक्या मुदतीकरीता अनामत रक्कम बाजार समितीकडे राहील. विनव्याजी



Scanned with OKEN Scanner

अनामत रक्कम ठरविणेचा व त्याबाबतची पध्दत ठरविणेचा अधिकार बाजार समितीस राहील.

नियम- ७ प्लॉट देण्याची पध्दत बाजार समिती ठरवील ती राहील. त्यानुसार जो प्लॉट ज्याला देण्यात येईल तो त्यांना घ्यावा लागेल. प्लॉट शिल्लक नसल्यास प्लॉट देणेची जबाबदारी बाजार समितीवर राहणार नाही.

नियम- ८ बाजार समिती ठरवील त्या तारखेच्या आत प्लॉटधारकाने भाडेपट्टा करुन घेतला पाहिजे. प्लॉटचा कब्जा ज्या तारखेस भाडेपट्टा करण्यात येईल त्या तारखेस देण्यात येईल. त्याप्रमाणे भाडेपट्टा करुन न घेतल्यास भाड्यासंबंधी झालेले सर्व करार आपोआप रद्द होतील व अर्जासोबत भरलेली भाड्याची रक्कम मार्केट कमिटीकडे डुल होईल व ती रक्कम परत मागणेचा भाडेकरुस अधिकार राहणार नाही. प्लॉट प्रत्यक्षात ताब्यात दिल्यापासून अगर बाजार समिती जी. तारीख ठरवील त्या तारखेपासून प्लॉटचे भाडे चालू होईल. सदर तारखेपासून त्या मार्केट वर्षातील वर्ष अखेरपर्यंतचे भाडे नियम ३ मधील भाड्यास अनुसरुन हिशोबाप्रमाणे घेण्यात येईल व उरलेली रक्कम परत करण्यात येईल.

नियम- ९ भाडेपट्टा करुन देणेकरीता मुद्रांकित कागद वगैरे सर्व खर्च प्लॉट घेवू इच्छिणा-याने केला पाहिजे. प्लॉटधारकास भाडेपट्टा करुन घेता येत नाही असे दिसून आल्यास प्लॉट संबंधी झालेले सर्व करार आपोआप रद्द होतील.

नियम- १० प्लॉट कब्जात दिल्यापासून त्या प्लॉटचे सरकारचे व महानगरपालिकेचे सर्व प्रकारचे कर, आकार, फी, सारा प्लॉटधारकाने परस्पर भरले पाहिजे. अशा प्रकारचे कर, आकार, फी, सारा बाजार समितीस द्यावे लागल्यास किंवा भरावे लागल्यास ती रककम बाजार समिती ठरवील त्या व्याज दराने आकारणी करुन प्लॉटधारकाकडून वसूल करण्यात येईल.

नियम- ११ सदर प्लॉटचा उपयोग टेलीफोन एक्सचेंज ऑफीससाठी करावयाचा आहे. सदर प्लॉटचा उपयोग बाजार समितीने ज्या कारणासाठी अथवा व्यवसायासाठी प्लॉट दिलेला आहे त्या कारणासाठीच केला पाहिजे. सदर प्लॉटमध्ये इतर कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करता येणार नाही. व सदर प्लॉटमध्ये कोणत्याही आक्षेपार्ह मालाचा साठा करता येणार नाही.

नियम- १२ प्लॉट कब्जेत घेतलेपासून एक वर्षाचे आत प्लॉटधारकाने करावयाचे बांधकामाचे नकाशे व स्पेसिफिकेशन बाजार समिती व सोलापूर महानगरपालिका आणि अन्य कार्यालये यांचेकडून संम्मत करुन घेवून बाजार समितीने ठरविलेल्या नमुन्यानुसार बांधकाम पूर्ण करावयास पाहिजे. योग्य कारणाकरीता मुदतवाढ मागण्यात आली आहे. अशी खात्री झालेस ही मुदत बाजार समिती वाढवू शकेल. मात्र अशी मुदतवाढ २ वर्षापेक्षा अधिक राहणार नाही. बांधकामात फेरफार अगर बांधकाम दुरुस्ती करावयाची असल्यास बाजार समितीची व सोलापूर महानगरपालिकेची मंजूरी घेतली पाहिजे. बांधकाम मुदतीत पूर्ण न केल्यास प्रत्येक बाजार वर्षास



Scanned with OKEN Scanner

अगर त्याचे भागास रुपये २००/- प्रमाणे विलंब आकार प्लॉटधारकाने बाजार समितीकडे भरला पाहिजे.

नियम- १३ प्लॉटची कोणत्याही परिस्थितीत विभागणी करता येणार नाही.

नियम- १४ बाजार समितीस सार्वजनिक उपयोगासाठी जरुरी असल्यास सदरचे प्लॉटस परत घेण्याचा बाजार समितीस अधिकार राहील.

नियम- १५ प्लॉटधारकाने आवश्यकतेपेक्षा जादा प्लॉट धारण केलेले आढळून आलेस प्लॉटस परत घेण्याचा बाजार समितीस अधिकार राहील.

नियम- १६ प्लॉटधारकास त्याला दिलेल्या जागेपेक्षा जास्त जागेचा वापर करता येणार नाही.

नियम- १७ प्लॉटधारकांचा व्यवसाय बंद झाल्यास किंवा प्लॉटधारक प्लॉटमध्ये व्यवसाय करीत नसल्याचे बाजार समितीचे निदर्शनास आल्यास प्लॉटचा कब्जा घेणेचा अधिकार बाजार समितीस राहील.

नियम- १८ प्लॉटधारकास बाजारपेठेतील व्यवहारास अथवा रहदारीस शिस्तीस अडथळा येईल अथवा बाधा येईल अथवा बाजार पेठेतील व्यवहारावर अनिष्ठ परिणाम होईल अशा प्रकारचे कृत्य अथवा व्यवहार करता येणार नाही. अशा प्रकारचे कृत्य अथवा व्यवहार केल्याचे दिसून आल्यास त्याचा प्लॉट परत घेणेचा अधिकार बाजार समितीस असेल.

नियम- १९ प्लॉटधारकाने बाजार समितीचे हे उपनियम, नियम, अटी व ठराव व हुकूम याचा भंग केल्यास किंवा सार्वजनिक आरोग्यास विघातक असे कोणतेही कृत्य केल्यास किंवा परवानगी शिवाय त्याचा प्लॉट व इमारतीत पोट भाडेकरु ठेवल्यास किंवा प्लॉट इमारत गहाण, दान, विक्री अगर अन्य त-हेने बाजार समितीच्या हक्कास बाधा येईल अशा प्रकारे तबदील केल्याचा त्याचा प्लॉट व इमारत परत घेण्याचा बाजार समितीस अधिकार असेल.

नियम- २० भाड्याने दिलेल्या प्लॉटची मालकी नेहमी बाजार समितीची राहील. फक्त प्लॉटची जागा भाडेपट्ट्याने ठरविलेल्या मुदतीपर्यंत वहिवाटण्याचा हक्क प्लॉटधारकास असेल. भाडेपट्ट्यातील मुदतीपूर्वी भाडेकरुस भाडेपट्टा रद्द करुन घेता येणार नाही.

नियम- २१ या उपनियमात कारणाकरीता बांधकाम न केलेला मोकळा प्लॉट बाजार समितीस परत घ्यावा लागल्यास त्यांनी भरलेल्या भाडेपट्ट्याचे रकमेतून प्लॉटचा कब्जा दिल्यापासून झालेली वर्ष किंवा वर्षाचा भाग या कालावधीकरीता हिशोबाने येणारी रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम व प्लॉटवर बांधकाम केले असल्यास श्री. सिध्देश्वर बाजारपेठ ज्याच्या हद्दीत आहे. अशा राज्य सरकारचा कार्यकारी अभियंता, इमारत व दळणवळण खाते यांजकडून करुन घेण्यात आलेले मुल्य निर्धारणआने (व्हॅल्युएशन) येणारी रक्कम या खेरीज बाजार समितीतर्फे कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई अगर कोणत्याही प्रकारची रक्कम

Scanned with OKEN Scanner

दिली जाणार नाही व त्याप्रमाणे त्याचा भाडेकरु त्यांना अलहिदा दस्तऐवज करुन घेण्याचा आहे.

नियम- २२ वरील नियम, उपनियम, अटी दुरुस्त करण्याचा अगर जादा करण्याचा किंवा वगळण्याचा बाजार समितीस अधिकार असेल व असे नियम व उपनियम प्लॉटधारकांवर बंधनकारक राहतील.

नियम- २३ वरील कोणत्याही उपनियमांचा भंग प्लॉटधारकांनी केल्यास त्याचे भाडेकरु म्हणून असलेले नाते व वरील नियमानुसार त्यास प्राप्त झालेले सर्व हक्क नष्ट करणेचा अधिकार बाजार समितीस आहे. अशा वेळी भाडेपट्ट्याच्या मुदतीचा आधार प्लॉटधारकास घेता येणार नाही.

नियम- २४ वरील अटी व शर्ती ह्या भाडेपट्ट्याच्या शर्तींचा भाग राहतील त्यास अधिन राहून भाडेपट्ट्याच्या जादा शर्तीसह प्लॉटधारकाने भाडेपट्टा करुन दिला पाहिजे.

नियम- २५ वरील नियम व उपनियमाच्या अर्थासंबंधी वाद उत्पन्न झाल्यास बाजार समितीचा निर्णय अखेरचा असेल.

---

सचिव सभापती

सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर

या कार्यालयाचे जा.क्र.पणन/कृउबास/सो/आकृतिबंध/मंजुरी/ ६७४ /२०१३
दि: २०/०२/२०१३ अन्वये पान क्र.१ ते ११४ ला मंजुरी दिली असे.

जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, सोलापूर.

DISTRICT DEPUTY REGISTRAR COOPERATIVE SOCIETIES, SOLAPUR

Scanned with OKEN Scanner